वर्ष १५ • अंक ४ • १६ जुलै २०१५

किंमत रु. १५/-

# पालकनीती

पालकत्वाला वाहिलेले मासिक



**पा ल क नी ती**
पालकत्वाला वाहिलेले मासिक

**संपादक**
संजीवनी कुलकर्णी

**संपादक मंडळ**
प्रकाश अनभूले
मधुरा राजवंशी
वसीम मणेर
सोमीनाथ घोरपडे
नीला आपटे
मंजिरी निंबकर

**मुखपृष्ठ व अंक मांडणी व रेखाटने**
वसीम मणेर

**मुखपृष्ठ छायाचित्र**
मीथिल मोमाया

**अक्षरजुळणी**
स्वाती जामदार

**जानेवारी ते डिसेंबर २०१५ साठी वर्गणी रु.२००**
वर्गणीचा चेक / ड्राफ्ट
'पालकनीती परिवार'
या नावाने काढावा.

**संपर्क :**
**पालकनीती परिवार,**
प्रगत शिक्षण संस्था
रिंग रोड, लक्ष्मीनगर,
फलटण ४११५२३
०२१६६ २२३०४१
psspalakneeti@gmail.com
www.palakneeti.org

पालकनीती परिवाराचे प्रकाशन
वर्ष १५ वे अंक ४ था
१६ जुलै २०१५


लेखांत व्यक्त झालेली मते लेखकांची व्यक्तिगत समजावीत.

## या अंकात

- **पानं उलटताना** – अहल्या नायडू, मीथिल मोमाया
- **जडले पुस्तकांशी नाते** – विद्यादेवी काकडे
- **बालवाडीतील वाचनालय** – समीरा कुरेशी
- **आमचे यशवंत वाचनालय** – सुनिता गावित
- **घरातले वाचन** – नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर
- **आली पुस्तकगाडी...** – शालिनी नारनवरे
- **खेळघरातील वाचनजत्रेच्या निमित्तानं...** – शुभदा जोशी
- **बहुरूपी गूगल – भाग १** – प्रकाश अनभूले

## खिडकी में बैठा बच्चा...

खिडकी में बैठा बच्चा
किताब गोद में लेकर कहता है...
बहुत बड़ी दुनिया
बसती है किताब में
बाग की हर कली
खिलती है किताब में
यहाँ गम कायम नहीं रहता
यहाँ दर्द का ठिकाना नहीं होता
एक खुशी की लहर
उमडती है किताब में....
लडाई झगडा मजे सा
मिलना बिछडना मजे सा
राहत ही राहत
सुकून ही सुकून है
परियों का बसेरा है...
कितना कुछ है किताब में..



वह ख्वाब देखता है
कि दुनिया का हर बच्चा
डूबा रहे किताब में
दुनिया के आतंक से दूर
हर जुल्म हर अत्याचार से दूर
कुछ पल के लिए ही सही
दुनिया का हर बच्चा
डूबा रहे किताब में
खिडकी में बैठा बच्चा
किताब गोद में लेकर सोचता है...

**फारुक काझी**
farukskazi82@gmail.com
8275459276

संपादक, मुद्रक, प्रकाशक व मालक - डॉ. संजीवनी कुलकर्णी यांनी पालकनीती परिवार करिता ग्रीन ग्राफीक्स, सी-१०२, सुनिता अपार्टमेंट, १४१७ कसबा पेठ, पुणे-४११०११ येथे छापून घेऊन अमृता क्लिनिक, संभाजी पूल कोपरा, कर्वे रस्ता, पुणे-४११००४, येथे प्रकाशित केले.

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदान प्राप्त झाले आहे परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.

# संवादकीय

**का**य वयाच्या मुलीला तुम्ही पुस्तक हातात देऊ शकता ?

तिला बसता येऊ लागले की.

कोणत्या वयापासून वाचून दाखवू शकता ?

जन्मल्यापासून.

ग्रंथालयाची ओळख तिला केव्हा करून द्यावी ?

बालवाडीत प्रवेश घेतल्यापासून किंवा घरात पुस्तकांचे कपाट असेल तर जन्मापासून. अगदी जन्मापासून देण्याच्या दूध, प्रेम, माया, लक्ष, लसीकरण, यांच्या यादीतच बसतात पुस्तके.

अनेक पालकांच्या मनात असे प्रश्न असतात. वाचनाची आवड असलेल्या पालकांना ते पडत नाहीत, पण न वाचणाऱ्या पालकांना मात्र ते सतावतात.

खरोखरीच का इतकी महत्त्वाची असतात पुस्तके ?

कदाचित गोष्टी सांगण्याच्या भारतीय मौखिक परंपरेला ही जरा अतिशयोक्ती वाटेल. पण जर मूल खऱ्या अर्थाने उद्याच्या जगात सक्षमपणे वावरायचे असेल तर त्याने पुस्तकांशी दोस्ती करायलाच हवी. वाचता येण्याच्या आधीपासून ते वाचायला शिकवण्यापासून पुढे आयुष्यभर आपल्या मुलाने विचार करायला हवा असेल तर त्या विचारांना सातत्याने प्रेरणा देतात ती पुस्तकेच. गंमत म्हणजे यासाठी प्रेरक आणि उपदेश करणारी पुस्तकेच हवीत असे मुळीच नाही. मूल रंगून जाऊन पुस्तक वाचत असले की पुरे.

शाळेत असतातच की पाठ्यपुस्तके. त्याशिवाय वेगळ्या पुस्तकांची गरज आहेच का ?

पाठ्यपुस्तकांना मर्यादा आहेत. विषयांच्या, मजकुराच्या, शब्दाच्या आणि अर्थाच्या. शाळेत पाठ्यपुस्तक वाचलेच पाहिजे असे असते. तिथे निवडीचा अवकाश नसतो. पण इतर पुस्तकांच्या बाबतीत मुलांना निवडीचे आणि वाचण्याचे स्वातंत्र्य असते. पाठ्यपुस्तकाचे वाचन करताना प्रश्नांची उत्तरे देता यावीत असा दिलेला हेतू मनात धरूनच करावे लागते. आपण निवडलेले पुस्तक मात्र आपण कसेही वाचू शकतो. अधून-मधून कुठलाही भाग वाचू शकतो. तर काही भाग चक्क सोडूनही देऊ शकतो. विषयांचेही बंधन नसते, ठरवलेल्या गोष्टींपलीकडचेही एखादे पुस्तक हातात सापडते आणि बरेच काही सांगून जाते. शिवाय 'रोहनच्या घरी आलेल्या पाहुण्याचे नाव काय होते ?' किंवा 'या गोष्टीचे तात्पर्य काय होते ?' असे प्रश्न तिथे कोणी विचारत नाही. तसे प्रत्येक गोष्टीला तात्पर्य असतेच. पण एखाद्या गोष्टीतून सर्वांनी एकच तात्पर्य शिकले पाहिजे हा अट्टहास न ठेवता वेगवेगळा अर्थ लावण्याचे स्वातंत्र्य वाचकाला मिळते. तसे स्वातंत्र्य पाठ्यपुस्तक अनेकदा देत नाही. किंवा असले तरी अभ्यासाच्या रेट्यामुळे मूल ते घेऊ शकत नाही. त्यामुळे पाठ्यपुस्तके वाचून मुलांना जे काही मिळते त्यापेक्षा बरेच काही त्यांना इतर पुस्तके वाचून मिळते आणि त्यात मोठा वाटा आहे स्वातंत्र्य आणि आनंद यांचा.

आजकाल पुस्तके कागदावरच नाही तर संगणकाच्या किंवा त्यासारख्या पडद्यावरही वाचता येतात. तुम्ही किंडलचे सदस्य झालात की त्यावर उपलब्ध असणारी अक्षरशः हजारो पुस्तके तुम्ही अगदी कमी किमतीत त्यावरून उतरवून घेऊन वाचू शकता.

याशिवाय चित्रे व चित्रफीत रूपातील माहितीही मुलांना आकर्षित करते. कसलीही माहिती मिळवायला सांगितली की आमचा असा अनुभव आहे की हल्लीची मुले प्रथम यूट्यूब वर चित्रफीत मिळते का ते बघतात. नंतर फोटो गॅलऱ्या शोधतात व सर्वात शेवटी मजकुराकडे येतात. माहितीजालावरून संगणकावर आता अफाट माहिती मिळते. पण तितकाच कचरासुद्धा सापडतो. बाभळीचे काटे चुकवून पाला खाणाऱ्या शेळीच्या ओठांसारखा मुलांचा मेंदू संवेदनशील असावा लागतो. नव्या पिढीला हे कौशल्य बऱ्यापैकी अवगत असते असे साधारणतः दिसते.

असे असेल तर पालकांच्या मनात पुढचा प्रश्न उमटतो. संगणकावर सराईतपणे हात चालवणाऱ्या मुलांना वेगळी आणखी पुस्तके कशाला हवीत ?

मुलांच्या दृष्टीने तर संगणक आले म्हणून पुस्तक वाचनाचे महत्त्व निश्चितच कमी झाले नाही.

टेक्नोसॅव्ही लोकही पुस्तकात रमताना दिसतात.

जगताना मुले आपल्या परिसराविषयी व आजूबाजूच्या लोकांविषयी माहिती मिळवतात. पण पुस्तकांची दुनिया उघडी झाल्यावर ती जगाविषयी ज्ञान मिळवतात. आणि हे ज्ञान त्यांना पुढे जाऊन वाचलेल्या किंवा पाहिलेल्याचे आकलन होण्यास मदत करते. दुसरीच्या मुलांवर एक प्रयोग केला गेला होता. या सगळ्या मुलामुलींना वाचता येत होते. कोळी या कीटकाविषयी एक परिच्छेद त्यांना वाचायला दिला. त्याआधी त्यांना कोळ्यांविषयी आधीपासून काय माहीत आहे याची चाचणी घेतली. परिच्छेद वाचल्यानंतर पुन्हा प्रश्न विचारले. तेव्हा असे आढळले की ज्यांचे पूर्वज्ञान अधिक चांगले होते त्या मुलांची उत्तरे, विशेषतः जिथे केवळ माहिती ध्यानात ठेवणेच नाही तर तर्क लावण्याची गरज होती अशा प्रश्नांचीही, अधिक समर्पक होती. साहजिकच चांगले गुण पाडण्यासाठीही मुलांचे वाचन वाढवणे गरजेचे दिसते.

वाचन हा काही उपजत असणारा किंवा अनुवंशावर आधारलेला गुणधर्म नव्हे. प्रयत्नाने वाचन रुजवता आणि वाढवता येते. त्यातली गंमत बघायला शिकवता येते. त्याची गोडी लागते. शब्दांपलीकडचा भावार्थ समजून घ्यायला शिकवता येते. भरपूर वाचणाऱ्याला अनेकदा आपलाआपणच तो समजू लागतो. यातूनच विचार करण्याची, स्वत:ला अभिव्यक्त करण्याची सहज सवय होते. आपल्या मुलांना हे जमावे अशी इच्छा असली तर यासाठी सजग पालक, शिक्षक (आणि ग्रंथपालही) बरेच काही करू शकतात. ग्रंथालये ही निव्वळ पुस्तके देवाण-घेवाण करण्याची ठिकाणे न राहता शिक्षणाची जिवंत केंद्रस्थाने बनू शकतात.

• • •



# पानं उलटताना:

## पुस्तकं नव्या वाचकाला आणि नवे वाचक पुस्तकांना कसं घडवत आहेत...

**अहल्या नायडू** या मुंबईस्थित संपादक आहेत तर **मीथिल मोमाया** हे व्यावसायिक वन्यजीव छायाचित्रकार आहेत. या दोघांनी मिळून २०१३ मध्ये 'इटर्नल लायब्ररी' ही ग्रंथालय व्यवस्थापनाबद्दल सल्ला देणारी संस्था स्थापन केली तर वाचन-संस्कृती रुजवण्याच्या हेतूने २०१४ मध्ये 'ट्रिलजी' हे ग्रंथालय सुरू केले.

लहानपणी पुस्तकं कुठं कुठं चित्रविचित्र जागी सापडायची! कपाटात, कपड्यांच्या खाली, आईच्या पाककृतींसोबत शकुंतला आणि काही प्रेमकथा असायच्या. बाबांच्या बॅगेत पासबुकांच्या बरोबर हनुमान चालीसा आणि टॉम क्लॅन्सी दाटीवाटीनं बसलेले. थोरल्या भाऊ बहिणीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये दडलेली क्लासिक्स आणि मिल्स अॅन्ड बून. आणि आमच्या खेळण्यांच्या आणि वह्यांच्या गराड्यात आमचं आमचं होतं एनिड ब्लायटन आणि काउंट ऑफ मॉंटे क्रिस्टो.

वाचनाची सवय घरातल्या प्रत्येकाला होती. दर रविवारी दुपारी आजोबा न चुकता काहीतरी वाचत. काका काकीच्या वाचनाच्या त्यांच्या त्यांच्या आवडी होत्या. वारसाहक्कानं दागदागिने आणि कपडेलत्ते असल्याप्रमाणे शब्दकोश जुन्यांकडून नव्या पिढ्यांकडे दिले जात होते. जरी वर्गात काही मुलं वाचणारी नसली, तरी इतर पुष्कळ मुलांबरोबर पुस्तकांची देवाणघेवाण शक्य होती.

पण आज आजूबाजूला बघितलं तर आम्ही विचारात पडतो की नक्की काय झालं? कुठं गेली ती रेल्वेत कादंबऱ्या आणि वर्तमानपत्रं वाचणारी माणसं? का ती आपल्या मोबाईल फोनमध्ये वाचत असतात म्हणून दिसत नाहीत? पालक तक्रार करतात की मुलं वाचत नाहीत. काही महाभाग तर गर्वानं सांगतात की कॉलेज सोडल्यापासून त्यांनी एकही पुस्तक वाचलेलं नाही आणि पुस्तकं मरत चालली आहेत यावर जवळजवळ सगळ्यांचा विश्वास आहे.

जवळ जवळ एक दशक पुस्तकांशी निगडीत कामात घालवल्यानंतर आणि दोन वर्षं वाचनालय आणि पुस्तक विक्री केंद्र चालवताना आम्हा दोघांना काही गोष्टी आढळून आल्या.

### प्रकाशन व्यवसायाची सद्यस्थिती

ऐंशी आणि नव्वदच्या दशकातील मंदीनंतर प्रकाशन व्यवसायात तेजी आली. शहरी कथांचा पूर, अनेक छोट्यामोठ्या प्रकाशन संस्थांचा उदय आणि प्रसार, पुस्तकांची जाहिरात करण्यासाठी नव्यानं उपलब्ध झालेल्या सोशल मीडियासारख्या जागा, काटेकोर नियोजन करून केलेल्या अनेक पुस्तकजत्रा, पुस्तक प्रदर्शनं, सोहळे, उत्सव, कथांसाठी सतत भुकेला असणारा अतिश्रीमंत चित्रपट उद्योग, आणि रस्त्याकडेला स्वस्तात मिळणाऱ्या तोतया पुस्तक प्रतींचा चालणारा समांतर धंदा या सर्वांनी सार्वत्रिकरित्या पुस्तक प्रकाशन उद्योगाचा चेहरामोहराच बदलून टाकला. या बदलानं पुस्तक उद्योगाच्या भविष्यावरही पकड घेतली आहे.

पाठ्यपुस्तकं आणि शैक्षणिक पुस्तकं वगळता फिक्शन (कथा, कादंबऱ्या, कविता) आणि नॉन-फिक्शन (प्रवास वर्णनं, आत्मचरित्र, आध्यात्मिक, पाककला आणि इतर निबंध) या प्रकारातील सामग्री सध्या प्रामुख्यानं वाचनास उपलब्ध आहे.

गेल्या सात आठ वर्षांत मुलांसाठीचं साहित्य हे साहित्यिक दर्जा आणि छपाईची प्रत या गुणात्मक पातळीवर फार पुढं गेलेलं आहे. भारतीय पुस्तकांना आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळू लागले आहेत. आजचे विषयही मुलांच्या भावविश्वाशी निगडीत आहेत आणि त्यांचा कल लक्षात घेऊन निवडलेले आहेत. हॅरी पॉटरच्या यशानं प्रकाशन आणि छपाई क्षेत्रात नवीच क्रांती आली. मुलांना आवडणारी पुस्तकं, त्यातील पात्रं, त्यांची खेळणी याचा नवा उद्योगधंदा सुरू झाला. मालिका प्रकारची पुस्तकं निर्माण करून त्याच त्याच पात्रांमध्ये मुलांना गुंतवून ठेवून अनेक वर्षांच्या व्यवसायाची गणितं आता मांडली जात आहेत आणि त्याच्या शक्यता वेळप्रसंगी आर्थिक धोके पत्करूनही पडताळून पाहून घेतल्या जात आहेत. बालकांसाठीच्या साहित्यात आलेल्या पैशाच्या पुरामुळे अनेक छपाई कारखाने आणि वितरक आता प्रकाशक बनले आहेत. हा उद्योग चिरकाल राहणारा आहे आणि सद्यस्थिती पाहता हा केवळ वाढतच जाणार आहे असे संकेत मिळत आहेत.

भारतात सध्या नॉन-फिक्शन प्रकारातील पुस्तकं प्रकाशित करण्याचा जास्त रोख दिसत आहे, जेणेकरून आपल्या मुलांना परदेशी, आणि आंतरजालावरील माहितीवर अवलंबून राहावं लागू नये. कारण आंतरजालावरचं बरंचसं काम हे पाश्चिमात्य मुलांना नजरेसमोर ठेवून केलेलं आहे. मुबलक प्रकाशन होत असलं तरी आजच्या मुलांसाठी 'क्लासिक्स' निर्माण होणे हा अजून लांबचा पल्ला आहे. कारण आज मुलांसाठी करमणुकीची खूप साधनं उपलब्ध आहेत. त्यामुळं पालकांचा वाचनात सहभाग आणि उत्तेजन नसेल तर पुस्तकं बाजूलाच पडण्याची भीती जास्त.

मोठ्या माणसांसाठी वाचन उद्योग खूप काही घेऊन येतोय. नामांकित प्रतिष्ठित परदेशी प्रकाशन संस्थांनी आपली कार्यालयं भारतात थाटायला सुरुवात केली आहे. भारतीय लेखकांचं लेखन आणि 'भारतीयत्व' असणाऱ्या लेखनाला प्राधान्यक्रम मिळताना दिसत आहे. वेगवेगळ्या क्षेत्रात यशस्वी असलेले लोक लेखणी उचलून आपल्या गोष्टी वाचकांसमोर मांडू लागले आहेत. पुस्तकांची

जाहिरात करणं आज आंतरजालावरील अनेक सामाजिक कट्ट्यांवरून सहज शक्य आहे. आज यशस्वी होणाऱ्या पुस्तकांच्या मागे दोनतीन गोष्टी प्रामुख्यानं दिसतात. भाषा आणि गोष्ट साधी सरळ सोप्पी असते आणि पुस्तकाची किंमत एक सँडविच आणि कॉफीपेक्षा जास्त नसते. आंतरजालावरची पुस्तकांची दुकानं भरघोस सूट देतात आणि घरपोच सेवा अगदी क्षुल्लक किमतीत मिळते. या नव्या विक्री आणि वितरण व्यवस्थेमुळे प्रकाशकांचा उत्साह वाढला आहे आणि नव्या लेखकांवरही बाजी आजमावण्यासाठी ते तयार आहेत जे की पूर्वी फारसं दिसायचं नाही. या बदलांचे पडसाद स्थानिक भाषीय प्रकाशन व्यवस्थेवरही पडू लागले आहेत. खूप स्थानिक साहित्य भाषांतरित होऊन इंग्रजीमध्ये तर इंग्रजी साहित्य स्थानिक भाषेत येऊ लागलं आहे. भाषांतराचं एक मोठंच काम सध्या पुस्तक विश्वात उपलब्ध आहे. सध्या खूप लेखकांना आपलं काम दुसऱ्या भाषेत पाठवून प्रसिद्धी मिळवण्याची नामी संधी आहे. अनेक लोक जे आपली मातृभाषा जास्त वापरत नाहीत पण तिची नाळ सोडू इच्छित नाहीत, अशा लोकांसाठी ई-पुस्तकांच्या आणि ध्वनीपुस्तकांच्या माध्यमांतून तो संवाद आणि तो पूल सांधणं सहज शक्य झालेलं आहे.

आज स्व-प्रकाशित पुस्तकांनी प्रकाशन व्यवसायात एक महत्त्वाचं स्थान निर्माण केलं आहे. आपलं पहिलंवहिलं पुस्तक विनाअडचण प्रकाशित करण्याचं सुख लेखकाला याद्वारे मिळतं. यामध्येसुद्धा काही प्रचंड यशाच्या आणि तितक्याच साफ अपयशाच्या कहाण्या आपणास पाहायला मिळतात. मुरलेले प्रकाशक नसल्यामुळे आणि प्रतिसाद तपासण्याची कसलीच यंत्रणा नसल्यामुळे पुन्हा पुन्हा त्याच चुका होण्याची शक्यता खूप राहते. छपाई कामाचा कसलाच अनुभव नसणं, कॉपीराईटसंबधी अज्ञान, वितरण व्यवस्थेबाबत अनभिज्ञता, छपाईच्या दर्जाचा अंदाज नसणं अशा अनेक अडचणी असतानाही बरेच लेखक प्रस्थापित प्रकाशन संस्था सोडून स्वतः प्रकाशनाकडे वळताना दिसतात.

अलीकडे संपूर्ण प्रकाशन संस्थेनं चित्रपटसृष्टीचं कातडं पांघरल्यासारखं वाटतं. दर्जात्मक कथानकांवर वेळ न घालवता लोकांना आवडतील अशी मसालेदार कथानकं पटापट लिहून घेणं आणि छापून बाजारात आणणं, त्यांची वारेमाप जाहिरात करणं, पुस्तक प्रकाशनांचे मोठ्ठाले सोहळे आयोजित करणं, परिसंवाद घडवून आणणं, बातम्या छापून आणणं असं सर्रास नजरेस पडतं.

### डिजिटल विभाजन

डिजिटल तंत्रज्ञानामुळे सर्वच क्षेत्रात क्रांती आली आहे आणि प्रकाशनक्षेत्र त्यास अपवाद नाही. पहाटे उठण्यासाठी गजर लावणं असो की रात्री घरपोच चटपटीत जेवणाची ऑर्डर देणं असो, आज सर्व कामं फोन करताना दिसतो. त्यामुळे करमणुकीची अनेक साधनं पुरवणाऱ्या संस्था डिजिटल व्यासपीठावर आपलं वर्चस्व राखून आहेत. दुसऱ्या बाजूला 'आंतरजालापासून दूर राहा, व्यक्ती-व्यक्ती संपर्क वाढवा' असा विचारही मूळ धरू लागला आहे. लोक इंटरनेटपलीकडेही (की अलीकडे?) जग आहे हे जाणू पाहात आहेत. डिजिटल तंत्रज्ञानामुळे स्वघोषित रचनाकारांची भाऊगर्दीही पुष्कळ आहे. खरोखर दर्जेदार काम समोर येणं जरा अवघड होऊन बसलं आहे. दर्जेदार कलेचं विश्वसनीय दालन डिजिटल व्यासपीठावर शोधणं जरा अवघडच आहे. उलटपक्षी सर्वांसाठी खुल्या पण कलेचे कसलेही मापदंड नसलेल्या पुष्कळ जागा इथं दिसतात. त्यामुळे डिजिटल तंत्रज्ञानाच्या विस्ताराच्या दोन्ही बाजू आपणाला इथे दिसतात.

आज कळीचा मुद्दा लोक वाचत आहेत की नाहीत, हा नसून ते काय वाचत आहेत, हा आहे. वाचनाची कसलीही सवय नसणारे लोक आता फोनवर वाचते झाले आहेत. आंतरजालावरील सामाजिक कट्ट्यांवर बरंच वाचन घडतं. अनेक कथा आणि अनुभव तथाकथित लेखक नसलेल्या मंडळींकडून लिहिले जातात आणि मित्र परिवारात वाचले जातात. अनेक लेख वाचून त्यावर चर्चा घडतात. पुस्तकंसुद्धा वाचली जातात पण त्यांची निवड मुख्यतः कुणाकडून तरी झालेल्या शिफारशीवर असते. ज्या पुस्तकांबद्दल जास्त बोललं जातं त्या पुस्तकांकडे लोकांचा ओढा असलेला दिसतो. प्रकाशकांना याची व्यवस्थित जाण आहे आणि त्याचमुळे पुस्तकं छापली जात असतानाच त्यावर आधारित येणाऱ्या चित्रपटाची घोषणा आणि जाहिरातही तितक्यात जोरात होताना दिसते.

### सतत बदलत राहाणारी वाचन संस्कृती

पूर्वापार चालत आलेली वाचनसंस्कृती, जिचा उद्देश स्वविकास-स्वसमृद्धी होता तो आता अगदी तसाच राहिलेला नव्या काळात दिसत नाही. आपण मुद्दामहून शोधून काही लेख, पुस्तकं वाचतोय असं आता शक्यतो घडत नाही. जे सहज उपलब्ध आहे आणि 'शेअर' होतंय ते वाचण्याकडे आपला कल असतो. फक्त करमणूकप्रधान वाचन आता होताना दिसतं आणि तेही निवडक लेखकांना धरून, बऱ्याच काळासाठी. कमी होत जाणारी वाचनालयं हीसुद्धा याला कारणीभूत आहेत. कारण चांगल्या आणि वैविध्यपूर्ण विषयांच्या पुस्तकांना हात घालायचा तर तो कुठे हा प्रश्न आहेच की! बहुतांश पालक मुलांच्यात वाचनाची आवड कशी निर्माण करावी याविषयी अनभिज्ञ असतात आणि त्यांना वाटतं की शाळा हे करेल. परंतु घरी वाचनाचं वातावरण नसेल तर मुलं पुस्तक कसं हातात धरतील?

आमचा वाचनालय चालवण्याचा अनुभव मात्र आम्हाला समृद्ध करणारा आहे. वाचनाची आवड अजूनही पुष्कळ आहे हे बघून आम्हाला फार बरं वाटतं. वाचनालय आणि ते चालवणाऱ्या लोकांविषयी समाजात असलेला आदर हृदयाला स्पर्शून जातो. आम्हाला हेही पाहून समाधान वाटतं की समाजात वाचनालय ही एक सुरक्षित जागा मानली जाते. अशी एक जागा जिथं लोकांचं ज्ञान वाढेल, समज वाढेल आणि व्यक्तिविकास होईल. आमच्या कामात आम्ही पाहिलं आहे की आमचं आणि लोकांचं पुस्तकांवर असलेलं प्रेम आम्हाला खूप जवळ आणतं. एकमेकांचे विचार-आचार, आवडी-निवडीही जाणून घेतल्या जातात आणि अनेक नव्या नात्यांची सुरुवात इथून होते.

**अहल्या नायडू, मीथिल मोमाया**
tel@theeternallibrary.com
**मूळ इंग्रजी लेखाचा मराठी अनुवाद : वसीम मणेर**

# जडले पुस्तकांशी नाते



**विद्यादेवी काकडे** या कमला निंबकर बालभवन या शाळेत ग्रंथपाल म्हणून कार्यरत असून त्या ग्रंथालय तासाला ४ थी ते ९ वी पर्यंतच्या मुलांचे वेगवेगळे उपक्रम घेतात. त्यांनी २०१३ मध्ये उदयपूर येथून (टाटा ट्रस्ट आयोजित) ६ महिन्यांचे ग्रंथालयाचे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणात त्यांना मिळालेल्या नव्या दृष्टिकोनाच्या साहाय्याने शाळेच्या ग्रंथालयाचे रूप बदलण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे.

कमला निंबकर बालभवन एक प्रयोगशील शाळा. गतिशील, उत्साही, आनंदी मुले इथे बागडताना दिसतात. यातील काही विद्यार्थी दीर्घकाळ लक्षात राहतात. वर्षभरात चालू असणाऱ्या विविध कार्यक्रमांमध्ये या विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग असतो. कामगिरीही उत्कृष्ट असते. ती इतरांना सहकार्य करतात, शाळेच्या मंत्रिमंडळातील विविध पदे सांभाळतात, आपापली जबाबदारी निष्ठेने पार पाडतात. स्पर्धा परीक्षा असोत, सांस्कृतिक कार्यक्रम असो, निबंध, चित्रकला स्पर्धा असो सगळ्यात सहभागी होऊन बक्षिसेही पटकावतात. वैचारिक, बौध्दिक, सामाजिक सर्वच दृष्टीने समृध्द अशी ही काही मुले पाहताना प्रश्न पडतो की ही मुले इतकी सर्वगुणसंपन्न कशी? हा विचार करता-करता या मुलांची ग्रंथालयातील कार्डे पहिली. या मुलांचे अवांतर वाचन अफाट असल्याचे दिसून आले. जर वाचनाचा मुलांच्या व्यक्तिमत्वावर इतका प्रभाव पडत असेल, तर शाळेतील सर्वच मुलांनी अधिकाधिक वाचणे आवश्यक आहे, असे मला ग्रंथपाल व शिक्षिका म्हणून आवर्जून वाटले. जी मुले कमी वाचतात त्यामागची काय करणे असतील ती शोधण्याचा व त्यांचे वाचन वाढवण्याचा प्रयत्न करण्याचे मी ठरविले.

या प्रयत्नासाठी मी इयत्ता चौथीतील जून ते सप्टेंबर या काळात कमी पुस्तके वाचलेली आठ मुले निवडली. याच वयात वाचनाची आवड लागल्यास पुढे त्यांना निश्चित फायदा होईल, म्हणून चौथीची मुले निवडली. या प्रत्येक विद्यार्थ्याला वाचनातील- अक्षर ओळख, वाक्य-वाचन व वाचनातील समज आहे का हे तपासले. यात कोणालाही अडचण नव्हती. मग प्रत्येकाची वाचनातील आवड काय आहे हे तपासून पाहण्याचे ठरविले.

आमच्या ग्रंथालयात आठ हजार पुस्तके आहेत. इतक्या पुस्तकांमधून आवडीचे पुस्तक ग्रंथालय तासाच्या वेळी निवडणे खरोखरीच अवघड असते. मुलांना ग्रंथालयात त्यांच्या वयासाठी योग्य अशी कोणकोणती पुस्तके उपलब्ध आहेत हे कळावे यासाठी पुस्तक प्रदर्शन भरविण्याचे ठरविले. चौथीच्या वयोगटासाठी योग्य अशी विविध प्रकाशनाची हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेतील गोष्टींची पुस्तके, चरित्रे, माहितीची पुस्तके इत्यादींचे प्रदर्शन भरवले. हे प्रदर्शन पाहण्यासाठी या निवडलेल्या मुलांना बोलविले. या मुलांना कागद पेन्सिल देऊन जी पुस्तके त्यांना आवडतील अशा दहा पुस्तकांची यादी करण्यास सांगितले.

मुले पुस्तके कशी बघतात (ब्राउझिंग) व कशी निवडतात याचा निरीक्षण तक्ता तयार केला. पुस्तकातील चित्रे पाहणारी मुले, केवळ पुस्तकाचे मुखपृष्ठ पाहून, नाव वाचून पुढे जाणारी, पुस्तक चाळून, न्याहाळून पाहणारी, पुस्तकातील काही भाग वाचून पाहणारी मुले, मित्राने केलेली यादी पाहून स्वत:ची यादी तयार करणारी मुले असे सारे नमुने मला आढळले. एका पुस्तकाजवळ प्रत्येक विद्यार्थी किती वेळ थांबतो, कोणत्या भाषेची पुस्तके निवडतो, कमी लेखन असलेली पुस्तके निवडतो की जास्त या मुद्यांच्या आधारे मुलांचे निरीक्षण केले.

यात एका विद्यार्थिनीने दहा मिनिटांत सर्व पुस्तके पाहून निवडलेल्या दहा पुस्तकांची यादी दाखवली आणि ताई, जाऊ का? असे विचारले. तिला मी 'पुन्हा एकदा सर्व पुस्तके पाहा, कोणती पुस्तके पाहण्याची राहिली का ते पाहा,' असे सांगून परत पुस्तकांकडे वळवले. एका विद्यार्थ्याने मित्राचे पाहात पाहात पुस्तकाची निवड यादी तयार केली. एका विद्यार्थ्याने फास्टर फेणेच्या सर्व भागांची नावे लिहिली आणि मला हीच पुस्तके वाचायची आहेत असे त्याने सांगितले. एकाने खूप सारी पुस्तके पाहिली व सर्वात मोठी यादी तयार केली. (त्यानेच पुढे सर्वाधिक पुस्तके वाचली असे आढळून आले.) एका विद्यार्थ्याने सर्व पुस्तके अतिशय बारकाईने पाहून, चित्रे अधिक लक्षपूर्वक पाहात आवडलेले पुस्तक वाचलेदेखील. त्याला एकूणच सर्व पुस्तके पाहण्यास सर्वाधिक वेळ लागला.

मुलांना 'तुम्ही पुस्तके कशी निवडली?' असे विचारले असता असे आढळले की काहींनी विनोदी, गमती-जमतीची पुस्तके निवडली होती, काहींनी मित्रांनी वाचलेल्या पुस्तकांची निवड केली होती, काहींनी काही भाग वाचून आवडलेली पुस्तके निवडली होती, काहींनी नवी पुस्तके निवडली होती तर काहींनी भरपूर चित्रे असलेली पुस्तके निवडली होती. अशा प्रकारे विद्यार्थी अवांतर वाचनासाठीची पुस्तके कशी निवडतात हे पाहण्याचा अनुभव अतिशय नाविन्यपूर्ण होता.

या पुढला टप्पा होता मुलांची पुस्तके वाचण्याची आवड वाढविणे. त्यासाठी मी प्रकट-वाचन, मुलांच्या गोष्टी ऐकणे व पुस्तकांवर आधारित विविध उपक्रम घेण्याचे ठरविले. यासाठी वर्ग शिक्षकांच्या व पालकांच्या परवानगीने शाळेआधी आठवड्यातील ४० मिनिटांचे दोन तास या मुलांसोबत घेण्याचे ठरविले. असे एकूण २० तास उपलब्ध झाले.

त्या जादा तासात मी मुलांना एक छोटे गोष्टीचे पुस्तक वाचून

दाखवीत असे. त्यानंतर ३–४ जण त्यांनी घरी वाचलेल्या पुस्तकातील गोष्टी सांगत असत. नंतर आम्ही एक गाणे म्हणायचो किंवा पुस्तकाशी निगडित एखादा खेळ खेळायचो.

पुस्तकाचे प्रकटवाचन करताना वेगवेगळे प्रश्न विचारून मुलांची मते जाणून घेणे, गोष्टीत पुढे काय घडत असेल याविषयी अंदाज लावण्यास संधी देणे, चित्रातील बारकाव्यांकडे लक्ष वेधणे, गोष्टीशी संबंधित एखादा अमूर्त विचार करायला लावणारा प्रश्न विचारणे असा कार्यक्रम असे. काही तासांतच मुले अतिशय मोकळेपणे बोलू लागली.

एकदा हृतिकने 'कोरिका नावाचा पतंग' हे पुस्तक परत केले व हे पुस्तक मला अजिबात आवडले नाही असे सांगितले. तेव्हा आपण हेच पुस्तक वाचूयात असे म्हणून आम्ही ते वाचले. पुस्तक वाचून झाल्यावर सर्व मुले म्हणाली, ''इतकी चांगली गोष्ट तुला का आवडली नाही?'' तेव्हा हृतिकने सांगितले, ''त्यातील नावे वेगळी असल्याने मला ती गोष्ट समजली नाही.'' या पुस्तकात दक्षिण भारतातील मुलांची, माणसांची, गावांची नावे होती. अशा गोष्टींमुळेही मुलांना पुस्तक अवघड वाटू शकते हा एक नवाच अनुभव आला.

एकदा 'प्रथम'ची कार्डे वाचताना आकाशगंगा, सूर्यमाला, खंड, देश, राज्य, जिल्हा, तालुका, गाव व आपला पत्ता असे प्रत्येकाला सांगण्यास सांगितले. प्रत्येकाला मी कोठे राहतो हे सांगण्यास खूप आवडले. जसे मी आकाशगंगेतील सूर्यमालेत, सूर्यमालेतील पृथ्वी या ग्रहावर, पृथ्वीवरील आशिया खंडातील भारत या देशात, भारतातील महाराष्ट्र या राज्यात तर महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील, फलटण शहरातील, लक्ष्मीनगर येथील महारथी अपार्टमेंटमध्ये राहतो, अशी पूर्ण साखळी प्रत्येकाने सांगितली. एकदा इंग्रजी गोष्टींची पुस्तके देऊन त्यातील अवघड शब्द लिहिण्यास सांगितले. ते अवघड शब्द कोणकोणत्या शब्दकोशात कसे शोधायचे हेही दाखविले. एका तासाला 'आपली सृष्टी आपले धन' ही संदर्भ पुस्तके देऊन प्रत्येकाने त्या पुस्तकातील आवडलेल्या प्राणी किंवा पक्ष्यांविषयी माहिती वाचून लिहिण्यास सांगितले.

'ओळखा तुमचे पुस्तक' हा खेळ मुलांना खूप आवडायचा. यात मुलांनी गोलात बसून आधी वाचलेली पुस्तके मध्ये ठेवायची. एका विद्यार्थ्याच्या डोळ्यावर पट्टी बांधून इतर मुलांनी एक पुस्तक त्या पट्टी बांधलेल्या मुलाच्या हातात द्यायचे. इतर मुलांनी त्या पुस्तकातील गोष्टीविषयीचे क्लू सांगायचे, ज्यावरून त्या मुलाने गोष्टीच्या पुस्तकाचे नाव ओळखायचे. मुले अतिशय विचारपूर्वक क्लू द्यायची व त्या गोष्टी लक्षपूर्वक ऐकून डोळ्यावर पट्टी बांधलेली मुलेदेखील पुस्तकाचे नाव ओळखू शकत.

'तीन प्रश्न' या उपक्रमात दोन गट करून एका गटातील मुलांनी गोष्टीच्या पुस्तकातील एकच पान पूर्ण वाचायचे. त्या वाचलेल्या भागावर तीन प्रश्न तयार करून वहीत लिहायचे. तेच पान दुसऱ्या गटातील मुलांना वाचण्यास द्यायचे व आपण काढलेले प्रश्न त्यांना विचारायचे. दुसऱ्या गटाने त्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावयाची. या उपक्रमात मुले किती समजून घेऊन वाचतात, तसेच किती विचारपूर्वक प्रश्न विचारतात हे पाहणे अपेक्षित आहे. एकमेकांना प्रश्न विचारणे मुलांना निश्चितपणे आवडते.

आमच्या शाळेतील बालवाडीच्या शिक्षिका समीराताईंनी मुलांसाठी लिहिलेले 'Purple Jojo' हे पुस्तक 'तुलिका'ने प्रकाशित केले आहे. अशा प्रकारे एक लेखिका शाळेतच उपलब्ध झाल्याने मुलांना त्यांची मुलाखत घेण्यास सांगितले. मुलांनी अतिशय विचारपूर्वक प्रश्न विचारले जसे, तुम्हाला गोष्टी कशा सुचतात? तुमच्या गोष्टीत 'जोजो' हेच पात्र का घेतले? तुम्ही आणखी कोणती पुस्तके लिहीत आहात? पुस्तके कशी तयार होतात? चित्रे कोणी काढली? इ.

एकूणच या तीन महिन्यांमध्ये मुलांची पुस्तक वाचण्याची संख्या तिपटीने वाढली. त्यांचा आत्मविश्वास वाढला. वर्गामध्ये गोष्टी, कोडी, प्रश्नांची उत्तरे ती स्वतःहून सांगू लागली. वर्गातील चर्चेत सहभागी होऊ लागली. स्वतः प्रश्न विचारू लागली. त्यांची वाचनाची गती वाढली. त्यांनी स्वत: गोष्टी लिहिण्याचा उत्तम प्रयत्न केला. शाळेत विक्रीसाठी आलेल्या पुस्तक प्रदर्शनातून आवडीची पुस्तके खरेदी केली. काहींनी गाण्याची, काहींनी प्रयोगाची, काहींनी पर्यावरण विषयक तर काहींनी गोष्टीची पुस्तके घेतली. त्यांच्या द्वितीय सत्रातील गुणांमध्येदेखील वाढ झाली. ही सर्व मुले आता सहावीत आहेत. खालील तक्त्यात पाचवीतही त्यांनी वाचन कायम ठेवलेले दिसते.

| अनु. क्र. | मुलाचे नाव | वाचलेल्या पुस्तकांची संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **इ. ३ री** (संपूर्ण वर्ष) | **इ. ४ थी** सत्र १ (जून–ऑक्टोबर) | **इ. ४ थी** सत्र २ (नोव्हेंबर–जानेवारी) | **इ. ५ वी** (संपूर्ण वर्ष) |
| १ | विराज | ६ | ९ | १७ | २४ |
| २ | चेतन | ३ | ९ | ३० | ५६ |
| ३ | राही | ११ | ३ | १९ | २५ |
| ४ | रोहन | ७ | ६ | १७ | ३१ |
| ५ | राहुल | ४ | ५ | २५ | ३२ |
| ६ | अल्फिया | ६ | ७ | १८ | २७ |
| ७ | सौरभ | ५ | ३ | १५ | |
| ८ | वैष्णवी | ११ | ३ | २४ | |

(सर्व नावे काल्पनिक आहेत. शेवटचे दोन विद्यार्थी पाचवीत शाळा सोडून गेले.)

एकूणच या प्रयोगामुळे, पद्धतशीर प्रयत्नातून मुलांच्या वाचनाच्या सवयींमध्ये मोठा बदल घडवून आणता येतो हे मी पाहिले. मुलांच्या शारीरिक विकासासाठी आपण उत्तम संतुलित, पोषक आहार देण्यासाठी जागरूक असतो. त्याचप्रमाणे मुलांच्या बौद्धिक, मानसिक व भावनिक विकासासाठी उत्तम पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी आपण सर्वच प्रयत्नशील राहूयात.

**विद्यादेवी काकडे**
vkakade28@gmail.com
9922011088



# बालवाडीतील वाचनालय

**समीरा कुरेशी** गेली १० वर्षे बालवाडी मुख्य-शिक्षिका म्हणून कमला निंबकर बालभवनमध्ये कार्यरत आहेत. बालशिक्षणाचा त्यांचा सखोल अभ्यास आहे. त्यांनी बालशिक्षणावरची काही प्रशिक्षणेही घेतली आहेत. लहान मुलांसाठी लिहिलेली त्यांची दोन पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

बालवाडीच्या वर्गात मुलांना मुक्तपणे, स्वतंत्रपणे खेळता येईल, विचार करायला, मुक्त संभाषण करायला संधी मिळेल अशी वर्गरचना असते. यामध्ये जेथे खेळताना आवाज येईल असे म्हणजे भातुकली, ठोकळे असे कोपरे एका बाजूला असतात. तर वाचनालय, लेखन-कोपरा, विज्ञान-कोपरा असे शांतपणे काम करण्याचे कोपरे त्यापासून थोडे दूर असतात.

बालवाडीतील वर्ग-वाचनालयात १ किंवा २ फ्लॅनेल बोर्ड भिंतीला लावलेले असतात. टेबलावर टेबल क्लॉथ पसरून त्यावर हिंदी, मराठी व इंग्रजी पुस्तके ठेवलेली असतात. या पुस्तकांत मोठी मोठी, रंगीत, आकर्षक चित्रे असतात. चित्रांखाली मोठ्या अक्षरात, एक-दोन सुटसुटीत ओळीत गोष्ट लिहिलेली असते. काही पुस्तकांमध्ये तर लेखनच नसते. असतात फक्त चित्रे. या चित्रांना स्वतःची भाषा देऊन मुले गोष्ट वाचतात. कधी कधी गप्पांमधून मुलांना योग्य शब्द सुचवावे लागतात. कविता, गोष्ट, विनोद, निसर्गाबद्दल माहिती, विज्ञान प्रयोग, मोठी पुस्तके, लहान पुस्तके, कापडी पुस्तके, केसाळ पुस्तके अशी कितीतरी प्रकारची पुस्तके या कोपऱ्यात असतात. कधी कधी कोपऱ्यात सुतळ्या बांधून त्यावरही पुस्तके टांगून ठेवली जातात.

मराठी माध्यमाच्या बालवाडीत हिंदी आणि इंग्रजी पुस्तके कशाला? तर बालवाडीत मुलांना नाहीतरी वाचता येतच नसते. असे नी तसेही ती चित्रे पाहून स्वतःची गोष्ट रचत असतात. बालवाडीपासून मुलांनी अशा प्रकारे वेगवेगळी पुस्तके हाताळली तर मला वाचता येते हा आत्मविश्वास मुलांना येतो. शिशुगटातील एका मुलाने एकदा ताईंना एक पुस्तक दाखवून सांगितले, ''इथे काय लिहिले आहे माहीत आहे का?'' ताईंनी काय म्हणून विचारल्यावर तो म्हणाला, ''इथे इंग्रजीत मासा लिहिले आहे.'' ते चित्र होते ऑक्टोपसचे. परंतु मुखपृष्ठावर समुद्र काढला होता आणि पाणी आणि मासे हा संबंध मुलाला माहीत होता. चित्र, शब्द आणि पूर्वज्ञान यांचा संबंध जोडून अर्थ लावणे म्हणजे जर वाचन असेल तर तो मुलगा आत्मविश्वासाने वाचत होता असेच म्हणावे लागेल ना?

मुले लहान लहान गटात वर्ग-वाचनालयात बसलेली असताना ताई मुलांना तेथीलच एखादे पुस्तक वाचून दाखवतात. चित्रे दाखवत, हावभावासह व आवाजातील चढ-उतारासह पुस्तक वाचन होते. वाचून दाखवताना ताई प्रथम मुलांना पुस्तकाच्या मुखपृष्ठ, मलपृष्ठ, कणा अशा सर्व अंगांची ओळख करून देतात. कणा फाटला तर पुस्तकाची सर्व पाने वेगळी-वेगळी होतील आणि आपल्याला गोष्ट समजणार नाही म्हणून आपण पुस्तक कसे जपून वापरायचे ते



सांगतात व ग्रंथालयातील सर्व पुस्तके ही आपली जबाबदारी आहेत हे मुलांच्या मनात रुजवले जाते. नंतर ताई मुलांना नुसते मुखपृष्ठ दाखवतात. त्यावरून गोष्टीत कोण कोण पात्रे असतील व काय गोष्ट असेल ते विचारतात. नंतर सर्व चित्रे पाहून गोष्टीचा अंदाज लावायला सांगतात व नंतर मुलांकडे पुस्तकाचे तोंड करून ओळीवर बोट फिरवून चित्र व वाक्याचा संबंध लावत गोष्ट वाचून दाखवतात. पुस्तके वाचून दाखवताना पूर्णविराम, यमक जुळणारे शब्द, समानार्थी शब्द यांची ओळख करून दिली जाते. उदा. 'सोमवारी अळीने एक सफरचंद खाल्ले.' हे वाक्य वाचल्यावर ताई सांगतात की हे वाक्य पूर्ण झाले की शेवटी जो टिंब दिला आहे त्याला पूर्णविराम म्हणतात. आता आपण गोष्ट लिहिताना त्याच्यात या चिन्हाचा वापर करता येतो का ते पाहू. पुस्तक वाचून झाल्यावर ते वर्ग-वाचनालयातच ठेवले जाते. मुले वारंवार ते वाचायला घेतात असा अनुभव आहे.

वाचून दाखवून झाले की बरेचदा मुलांना त्या पुस्तकावर आधारित एखादा उपक्रम दिला जातो. पुस्तक आधीच ठरवलेले असल्याने वाचनालयाच्या कोपऱ्यात त्या पुस्तकातील पात्रांची चित्रे किंवा पपेट बनवून ठेवलेली असतात. तसेच चित्रे क्रमाने लावा किंवा चित्रांच्या मदतीने गोष्ट पूर्ण करा यासारखे उपक्रम करण्यासाठी आवश्यक ते साहित्य आधीच तयार करून या कोपऱ्यात ठेवलेले असते.

वर्ग-वाचनालयात टाकलेल्या सतरंजीवर मुले एकेकटी किंवा दोघा-तिघांच्या गटात बसतात. पुस्तके घेऊन चित्रे पाहतात. एकमेकांना गोष्ट सांगतात. कधी कधी भातुकलीच्या कोपऱ्यातून साड्या-बिड्या नेसून, बाहुल्या घेऊन त्यांना पुस्तके वाचून दाखवायला घेऊन येतात. सुरुवातीला पुस्तक उलटेही धरले जाते.

(पान १३ वर)

# आमचे यशवंत वाचनालय



**सुनिता गावित** या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वारुगड, सातारा येथे सहशिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. परिसरातून भाषा आणि पर्यावरण शिक्षण यावर त्यांचा विशेष भर आहे. लोकसहभागातून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी त्या सतत वेगवेगळे उपक्रम राबवत असतात. कलेची आवड आणि शाळा परिसरातील त्यांनी फुलवलेली परसबाग हे त्यांच्या शाळेचे प्रमुख आकर्षण आहे. एक प्रयोगशील व उपक्रमशील शिक्षिका म्हणून त्या सुपरिचित आहेत.

शंभू महादेव डोंगररांगेच्या कुशीत वसलेले कळसकरवाडी हे छोटेसे गाव. या गावाच्या मधोमध असणारी आमची जिल्हा परिषदेची शाळा. सोयी-सुविधा नसणाऱ्या, प्रगतीत मागे असणाऱ्या अशा शाळा म्हणजे जिल्हा परिषद शाळा हा समज खोटा ठरवणारी माझी शाळा. आजही मला त्या शाळेचा अभिमान वाटतो. शाळा इयत्ता सातवीपर्यंत. आमच्या शाळा भौतिक साधनात कुठेही कमी नाहीत. शाळेला संगणक होता. पण त्यावर मुलांना काही छान चित्रपट सोडले तर काय दाखवायचे असा प्रश्न आमच्यासमोर होता. शासनाने दिलेल्या पुस्तकांचे ग्रंथालय होते. पण त्यात मिळालेली पुस्तके कधी मुलांना आवडलीच नाहीत. त्यांचा उपयोग फक्त राष्ट्रीय नेत्यांच्या जयंत्या व पुण्यतिथ्यांसाठी व्हायचा. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्या अनेक बाबींची गरज आहे, त्यात ग्रंथालयाची भूमिका खूप महत्त्वाची आहे. आणि यातच आमच्या शाळेची निवड प्रगत शिक्षण संस्थेच्या भाषा सुधार प्रकल्पासाठी झाली. मी या संस्थेविषयी व संस्थेच्या कमला निंबकर बालभवन या शाळेविषयी ऐकून होते. त्यामुळे मला आनंद झाला. काहीतरी नवीन शिकता येईल या भावनेने मी भारावून गेले.

या प्रकल्पाच्या निमित्ताने आम्हाला एक महत्त्वाचे काय मिळाले, तर यशवंत विद्यार्थी मुक्त वाचनालय. सर्वात विशेष म्हणजे या वाचनालयासाठी लागणारा निधी पालकांनी उपलब्ध करून दिला. यामध्ये एकच सूत्र होते की प्रत्येक पालकाने आपल्या कुवतीने पुस्तकांसाठी निधी द्यायचा. आणि खरोखर सर्वांनी मदत केली. पुस्तके प्रगत शिक्षण संस्थेने उपलब्ध करून दिली तसेच त्यांनी देवघेव रजिस्टरही तयार करून दिले. त्यानुसार आठवड्यातून प्रत्येक वर्गाला एक दिवस पुस्तके बदलून घेता येऊ लागली.

या वाचनालयातील पुस्तके मुलांना खूप आवडली. ही पुस्तके लहान लहान होती पण मुलांच्या वयाचा व त्यांच्या आवडीनिवडीचा विचार करूनच निवडण्यात आली होती. यात नॅशनल बुक ट्रस्ट, रीड इंडिया, प्रथम, भारत ज्ञान विज्ञान समुदाय अशा काही प्रकाशनांची दर्जेदार पुस्तके मुलांना मिळाली. ग्रामीण भागातील मुलांना अशी पुस्तके सहसा उपलब्ध होत नाहीत. परिणामी ती मुले पाठ्यपुस्तकाच्या अभ्यासात खूप पुढे जातात पण अवांतर वाचनात मागे पडतात.

यशवंत वाचनालयातील पुस्तके खूप आकर्षक होती. त्यात रंगीबेरंगी चित्रे आणि त्याखाली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील छोटी छोटी वाक्ये होती. त्यामुळे मुले तिन्ही भाषा वाचू लागली. विशेष म्हणजे, आमच्या पहिलीच्या मुलांना वाचन येण्याअगोदर ती पुस्तकातील चित्रे पाहून त्याचा अर्थ लावून वाक्यरचना करू लागली. माझ्याकडे तीन वर्ग असल्याने माझ्या मुलांना याचा खूप फायदा झाला. आज मुले नियमित पुस्तके वाचतात. पुस्तकाचा आशय सहज सांगतात, मुखपृष्ठ, मलपृष्ठ, लेखक, प्रकाशन सांगतात. आज वाचनाने त्यांच्यात आत्मविश्वास आला आहे.

शासन ग्रंथालयांसाठी निधी देते पण पुस्तके घेण्याचे स्वातंत्र्य मात्र शिक्षकांना देत नाही. पुस्तके ही वरूनच पाठवली जातात. यात विद्यार्थ्यांची आवड, त्यांचे वय याचा विचार केलेलाच नसतो. म्हणून आलेली बरीच पुस्तके विद्यार्थ्यांना वाचण्यायोग्य नसतात. तर काही वेळा ही पुस्तके मुख्याध्यापक कपाटामध्ये बंद कुलुपात ठेवतात. यशवंत वाचनालयातून मुलांना हवी हवी वाटणारी पुस्तके त्यांना मुक्तपणे हाताळायला मिळाली.

पालकसभा, शाळा व्यवस्थापन समिती सभा, प्रशिक्षणे यांदरम्यान आम्ही पुस्तक प्रदर्शन आवर्जून लावतो. मुले आपल्या पालकांना पुस्तके दाखवतात, काही वाचूनही दाखवतात, आपल्या शब्दात पुस्तकाचा आशय सांगण्याचा प्रयत्न करतात. हे ऐकताना पालक आनंदित होतात. आज पालकांनाही पुस्तक-वाचनाचे महत्त्व पटले आहे. काही स्त्री-पालक आवर्जून पुस्तके वाचनासाठी घेऊन जातात. आता या वाचनालयात भर घालण्यासाठी लोक-वर्गणीतून आम्ही काही रक्कम जमवली आहे. त्यातून जादाची पुस्तके येतील आणि मग विद्यार्थ्यांना नवी नवी पुस्तके उपलब्ध होतील.

शिवाय आता हे फक्त वाचनापुरते मर्यादित न राहता मुले आज त्याच्यापुढे गेली आहेत. मुले स्वतः पुस्तके तयार करतात, त्यांची मुखपृष्ठे बनवतात. मुलांना चांगली पुस्तके वेळेत उपलब्ध करून दिली तर मुले वाचन व लेखन कौशल्ये लवकर आत्मसात करतात. बालसाहित्य मुलांना सृजनशील बनवते. मुलांची संवेदना जिवंत ठेवते. वाचनाने मुलांचे जग विस्तारत जाते. शाळेच्या चार भिंतींमध्ये सीमित झालेले जग पुस्तक-वाचनाने उंच उंच भराऱ्या घेते. वाचनाचे वेड लागलेली ही मुले आज कविता करतायेत, स्वतःच्या भाषेत आपली प्रतिक्रिया मांडतायेत. हेच तर शिक्षण आहे.

**सुनिता गावित**
sunitagavit75@gmail.com
7387345904

# घरातले वाचन

– नीलिमा गोखले, मंजिरी निंबकर



सर्व काही शिकण्याची गुरुकिल्ली आहे वाचायला शिकणे. उत्तम प्रकारे वाचायला शिकण्याचे महत्त्व जेवढे अधोरेखित करावे तेवढे कमीच आहे. मुलांच्या मेंदूच्या एकूण वाढीपैकी ९०% वाढ जन्मानंतरच्या पहिल्या तीन वर्षात होते. याचाच अर्थ हा की मुलांची शिकण्याची बहुसंख्य क्षमता पहिल्या तीन वर्षात विकसित होते. म्हणूनच पालक हे खरोखरच आपल्या मुलांचे पहिले शिक्षक असतात. पहिल्या तीन वर्षात पालक जे काही करतात किंवा करीत नाहीत त्याचा परिणाम त्यांच्या मुलांच्या विकासावर तसेच साक्षरतेवर होतो.

लिहायला-वाचायला शिकणे ही अतिशय गुंतागुंतीची प्रक्रिया आहे आणि या प्रक्रियेचे अनेक पैलू आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मुलांना या प्रक्रियेत रस वाटायला हवा! एकदा का रस वाटायला लागला की मग मुले हळूहळू पुस्तके व्यवस्थित हाताळणे, चित्रांचा अर्थ लावणे, गोष्टीचा आशय समजणे ही कौशल्ये आत्मसात करू लागतात आणि त्यांचा आत्मविश्वास वाढत जाऊन त्यांना अधिकाधिक वाचावेसे वाटते. अगदी लहान मुलांनाही वाचनात रस वाटावा यासाठी काय करता येईल? तर मुलांच्या आयुष्यात महत्त्वाचे स्थान असणाऱ्या व्यक्तीने मुलांसोबत रोज पुस्तक वाचणे- हे वाचन म्हणजे प्रकट वाचन किंवा मोठ्याने वाचून दाखवणे. दररोज हे कमीत कमी १५-२० मिनिटे करावे. यासाठी एक विशिष्ट वेळ ठरवून घेतली तर त्याची सवय व्हायला मुलांना मदत होते आणि मुले या वेळेची वाटही पाहू लागतात.

प्रकट वाचन ऐकण्याच्या अनुभवातून भरभर आणि चांगले वाचणे म्हणजे काय हे मुलांना समजते. घरातील किंवा आजूबाजूच्या मोठ्या मुलांनाही छोट्यांना वाचून दाखवायला प्रोत्साहन द्या म्हणजे वाचन-वाचनातील फरक मुलांच्या लक्षात येईल. मात्र यात मजा असायला हवी. शिकवण्याचा आव नको. तरच मुलांचा प्रकट वाचनातील रस टिकून राहील.

मुलांबरोबर वाचत असताना मुले आपले विचार, कल्पना बोलून दाखवतात. ते लक्षपूर्वक ऐकले पाहिजे. यामुळे ऐकणे आणि संवाद म्हणजे काय याचे चांगले उदाहरण मुलांसमोर उभे राहते. मूल चाचपडत आपले म्हणणे मांडत असताना आपण विचारपूर्वक ऐकले पाहिजे व गांभीर्याने प्रतिक्रिया दिली पाहिजे. मुलांबरोबर वाचत असताना आपण काय वाचतो आहोत याबद्दल मुलांशी आवर्जून बोला. तुमच्या मदतीने त्यांना नवे शब्द शिकायला व वाचलेले समजून घ्यायला मदत होईल. मुलांची शब्दसंपत्ती जितकी अधिक तितकी त्यांची आकलनशक्ती वाढते आणि त्यांचे वाचनाचे कौशल्य अधिक विकसित होते. बालवाडीतच उत्तम शब्द भांडार असणारी मुले पुढे जाऊन उत्तम वाचक बनतात.

आपण बरेचदा अमुक पुस्तके मुलांसाठी महत्त्वाची आहेत असे वाटून पुस्तके निवडतो. मुलांना त्यांच्या आवडीची किंवा ती एकट्याने वाचू शकतील अशी पुस्तके निवडू देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. कित्येकदा आपल्याला वाटते की अशी पुस्तके फारच सोपी असतात आणि मुलांना ती फारसा प्रयत्न न करता वाचता येतील. परंतु चांगले वाचता येण्यासाठी बराच वेळ लागतो. 'हे आपल्याला जमते' असे ज्या पुस्तकांबद्दल मुलांना वाटते अशी पुस्तके वाचण्याची भरपूर संधी मिळाली तर त्यांना स्वतःच्या क्षमतांबद्दल विश्वास वाटू लागतो व 'मला वाचता येते' असा त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

अजून एक करता येण्यासारखी गोष्ट म्हणजे आपले घर वाचनसमृद्ध बनवणे. ज्या घरांमध्ये पालक मुलांसमोर वाचताना, पुस्तकांबद्दल चर्चा करताना दिसतात, मुलांना वाचायला प्रोत्साहन देताना दिसतात, त्या घरातील मुलांना वाचन आणि लेखनाचे महत्त्व लवकर कळते. ज्या घरांत पालक नवी पुस्तके विकत घेतात, त्यांच्याबद्दल चर्चा करतात, भेट म्हणून पुस्तके देतात, समोर पुस्तक पाहिले की ते चाळल्याशिवाय त्यांना चैन पडत नाही तिथे मुलांनाही वाचावेसे वाटते. नव्हे, आपण कधी वाचायला शिकतो असे होते. पालक जेव्हा पुस्तक वाचता वाचता हसतात, काही भाग मोठ्याने वाचून दाखवतात, एखादी कथा किंवा कविता मला फार आवडली असे आवर्जून म्हणतात, तेव्हा मुलांच्याही मनात आनंद देणाऱ्या या वाचन-प्रक्रियेबद्दल कुतूहल निर्माण होते. वाचन हे एक कौशल्य असण्यापेक्षा ती एक आनंददायी गोष्ट आहे असे मुलांना वाटले तर मुले वाचण्यासाठी अधिक प्रेरित होतात.

पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे यासारखे वेगवेगळ्या प्रकारचे वाचन-साहित्य मुलांना उपलब्ध करून द्या. पण केवळ वाचन साहित्य नव्हे तर आपले विचार, कल्पना, भावना प्रकट करण्यासाठी कागद, तेलकट खडू, पेन्सिल, स्केच पेन, मार्कर यासारखे लेखन साहित्यदेखील उपलब्ध करून द्या. मुलांसमोर आवर्जून निरोप लिहिणे, लक्षात राहण्यासाठी चिठ्ठी लिहिणे, याद्या बनवणे, रेसिपी लिहिणे, संगणकावर काम करणे अशा लेखनसंबंधित कृती कराव्यात. यामुळे मुलांच्या मनात लेखन-वाचनाचे महत्त्व अधोरेखित होते.

मला येते हा विश्वास एकदा का मुलांमध्ये आला की मग पाहा ती कशी स्वतःहूनच लेखन वाचनाकडे वळताहेत ते. वाचन-लेखनाच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर त्यातील तांत्रिक बाबी- म्हणजे बाराखडी, शुद्धलेखन, शुद्ध उच्चार अशा गोष्टी मुलांवर लादल्या तर त्यांच्या त्यातील रस जातो. यामुळेच जर पालकांनी मुलांसोबत वेळ घालवून पुस्तक वाचनातील फक्त 'मजा' अनुभवायला त्यांना मदत केली तर या भक्कम भावनिक पायावर त्यांचे वाचन-लेखनातील पुढचे यश उभे राहील.

**डॉ. नीलिमा गोखले**
neelima.gokhale@gmail.com
9823053272

**डॉ. मंजिरी निंबकर**
manjunimbkar@gmail.com
9822040586

# आली पुस्तकगाडी...



**शालिनी नारनवरे** या व्यवसायाने शिक्षिका आहेत. २००४ मध्ये डी. एड पूर्ण केल्यानंतर त्या ग्राममंगल संस्थेत मुलांबरोबर शिकायला आणि शिकवायला गेल्या. ग्राममंगलमध्ये काम करता करता पुढे आणखी शिकावे म्हणून टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस मधून एलिमेंटरी एज्युकेशनमध्ये एम ए केले. त्यानंतर त्यांनी WOTR या संस्थेत नगर जिल्ह्यातील काही ग्रामीण शाळांमध्ये चालणाऱ्या शाळा सक्षमीकरण प्रकल्पाच्या प्रमुख म्हणून काम केले व एम. फिलही पूर्ण केले. सध्या त्या क्वेस्ट संस्थेत पुस्तकगाडी आणि ग्रंथालय उपक्रम या प्रकल्पांचे काम पाहात आहेत.

टण् टण् टण् घंटा वाजली. मधली सुट्टी झाली. सर्व मुलं वर्गातून बाहेर आली. पटांगणात उभ्या असलेल्या गाडीला बघून आपापसात बोलू लागली.

''ही बघ कसली तरी गाडी आली.''

''कोणाची आसल?''

''डाक्टरची आसल का?''

(मुलं गाडीच्या जवळ गेलीत.)

''या गाडीवं तं चित्रा हायेत.''

''चित्रातली पोरा बघ पुस्तकां वाचत्यात.''

''ए पाह्य पेटीत किती पुस्तकां हायेत.''

सगळी गाडीच्या आत लोंबकळून कुतूहलानं बघायला लागली. पण गाडी टेकडीवर लावलेली असल्यानं चारही दिशांनी बघता येईना. म्हणून एका मुलानं आपलं डोकं चालवलं. बाजूला पडलेल्या विटांतून दोन विटा उचलल्या आणि गाडीजवळ ठेवून, त्यावर उभा राहून आत बघू लागला. झालं, क्षणातच गाडीच्या चारही बाजूंना विटा रचल्या गेल्या. बघतात तर आत नुसती पुस्तकंच पुस्तकं.

एकजण म्हणाला– ''आरं,मला वाटला आत पोरा पुस्तका वाचीत आसतील.''

दुसरा– ''मला वाटला अशीच चित्रा आसतील.''

तिसरा– ''आरं पुस्तका आहेत.''

हे दृश्य आम्ही मुख्य कार्यालयाजवळ उभे राहून बघत होतो. काही मुलं त्या बंद दरवाजे असलेल्या गाडीतून आत बघत राहिली तर काही मागे सरली (कदाचित ती पुस्तकं त्यांच्यासाठी नसावीत या विचारानं) आणि आपापल्या सुट्टीतल्या उद्योगाला लागली.


पहिल्या दिवशीचा मुलांचा हा प्रतिसाद आम्हाला कल्पनातीत होता असं नाही. आणि म्हणूनच आम्ही दुसरे पर्याय आयोजून ठेवले होते. काही वेगळ्या प्रकारची खेळणी शिकविली तर मुलांना ते आवडेल म्हणून थेट पुस्तकवाचनाला हात न लावता पारंपरिक अभिनय गोष्ट सांगून, विज्ञान खेळणी बनवायला शिकवून, त्यांच्यात आणि आमच्यात एक खेळीमेळीचं नातं तयार करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे आम्हीही त्यांच्यातलेच एक आहोत असं त्यांना वाटू लागलं. मग हळूहळू पुस्तकातून गोष्ट वाचून दाखवायला (त्यातही



मुलांना पुस्तकं मिळण्याचं माध्यम कोणतंही असू देत. शाळेचं ग्रंथालय, किंवा पुस्तकपेटी, पुस्तक कोपरा, पुस्तक थैली असे छोटे संग्रह किंवा मग पुस्तकगाडीसारखे उपक्रम. शेवटी मुलांना विविध प्रकारची पुस्तकं हाताळायला, वाचायला मिळणं, त्यांच्याबद्दल बोलायला, लिहायला मिळणं महत्त्वाचं! साक्षर होणं आणि एक व्यक्ती म्हणून समृद्ध होणं या दोन्हीसाठी हे खूप गरजेचं आहे.

अभिनय आहेच) सुरुवात केली. मुलांना गोष्टी आवडायला लागल्या, पुस्तकं आवडायला लागली आणि मग ठरलेल्या दिवशी ती पुस्तकगाडीची वाट बघायला लागली.

पुस्तकगाडी हा पथदर्शी प्रकल्प असून या प्रकल्पाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती रुजवणं हा आहे. पालघर जिल्ह्यातील (कावळे, गुहीर, साकूर, साखरे, पळसुंडे, सूर्यमाळ, पाली गारगाव, भोपोली, कुर्झे) या १० आश्रमशाळांपासून या प्रकल्पाची सुरुवात झालेली आहे. हा पहिलाच प्रकल्प असावा ज्यात आदिवासी विकास विभाग आर्थिक सहकार्य करत आहे आणि क्वेस्ट ही संस्था तांत्रिक सहकार्य करत आहे. या दहाही शाळांमध्ये दर आठवड्यात भेटी दिल्या जातात. तुलनेने जवळ असलेल्या दोन आश्रमशाळांच्या जोड्या केलेल्या आहेत. चार लायब्ररी एज्युकेटर्स पुस्तकगाडीसोबत जातात. दोन लायब्ररी एज्युकेटर्स एका शाळेत उतरतात व दुसरे दोन पुढच्या शाळेत जातात. इयत्ता १ ते ७ मधील मुलांना पुस्तकं


तुम्ही जर इटकू पिटकू असता
तर तुम्ही काय केलो असते ?

मी जर उंदीर असतो तर मांजासांना
लपवून, गाणी म्हणून दाखवली असती.
एखाद्याच्या घरात खाताच्या गोष्ट
असतील तर त्याच्या एवढीच गोष्टी
कुरतडली असती.
उंदराची शाळा भरवून त्यांना गोष्ट
सांगीतली असती उंदरांना घेऊन
बाहेर काय खायला मिळते ते
पाहुन दुकानातला खाऊ खाऊन टाकला
असता तसेच कागद पत्र जातीचे
दाखले कुरतडून टाकले असते.
कारण मला कुरतडायला खुप
आवडते.

नाव - हर्षद दशरथ चोधरी
इयत्ता - पाचवी

वाचायला दिली जातात तसेच पुस्तकांवर आधारित उपक्रमही घेतले जातात. या प्रकल्पाअंतर्गत ३५०० मुलांसाठी हा कार्यक्रम सुरू आहे. पुस्तकगाडीत जवळजवळ ६०० टायटल्सची (इयत्ता १ ते ७ साठी) ३००० पुस्तकं आहेत.

दुर्गम भागातील मुलांचा भाषिक स्तर हा ग्रामीण किंवा शहरी मुलांच्या भाषिक स्तरापेक्षा वेगळा असतो त्यामुळे शहरी भागातील इयत्ता पहिलीच्या स्तरावरील पुस्तक हे कदाचित दुर्गम भागातील इयत्ता तिसरीच्या मुलांसाठी वापरावं लागेल. कारण त्यांना कमी भाषिक अनुभव मिळालेला असतो. कधीकधी याची इतकी काटेकोर विभागणी करता येत नाही त्यामुळे पुस्तकांची विभागणी इयत्तांनुसार न करता स्तरांनुसार केलेली आहे. हे स्तर दोन किंवा तीन इयत्ता मिळून गृहित धरलेले आहेत. म्हणजे इयत्ता पहिली व दुसरी स्तर १ मध्ये, इयत्ता तिसरी व चौथी स्तर २ मध्ये, इयत्ता पाचवी ते सातवी स्तर ३ मध्ये अशी वर्गवारी केलेली आहे. पुस्तकातील चित्र, त्यातील मजकूर, अक्षरांचा लहान-मोठेपणा, वाक्याची लांबी या बाबी लक्षात घेऊन ही विभागणी केलेली आहे. गोष्टी, गाणी, माहितीपर पुस्तकं, कादंबऱ्या, आत्मकथनं, प्रवासवर्णनं, पत्रं इत्यादी अनेक प्रकारची पुस्तकं आहेत.

मुलांना दर आठवड्याला एक पुस्तक मिळतं. पुढच्या आठवड्यात गाडी आली की ते बदलून मिळतं. पटकन वाचून झालं तर मुलांमध्ये शिक्षकांच्या देखरेखीखाली अदलाबदलही चालते. पुस्तकं कशी हाताळावीत, पुस्तकं फाटू नयेत यासाठी काय करावं, पुस्तकं फाटली तर पुस्तकांच्या दवाखान्याचा वापर करून ती कशी नीट करावीत इत्यादींचे अनौपचारिक प्रशिक्षण मुलांना दिल्यामुळे मुलं पुस्तकांची काळजी घ्यायला लागली आहेत. ही पुस्तकं आपली आहेत,ती आपली म्हणून सांभाळली पाहिजेत, वाचायला घेतलेली पुस्तकं वेळेत परत केली पाहिजेत आणि फाटली तर ती चिकटवली पाहिजेत या बाबी आपोआपच त्यांच्या कृतीतून त्यांना समजल्याच्या लक्षात येतात.

लायब्ररी एज्युकेटर्स जेव्हा शाळांमध्ये जातात तेव्हा ते मुलांसोबत पुस्तकांवर आधारित वेगवेगळे उपक्रम करतात. हे उपक्रम योजताना त्यातून मुलांना निखळ आनंद कसा घेता येईल व त्यासोबतच त्यांचा भाषिक विकास आणि लेखन क्षमता कधी वाढेल हे पाहिले जाते. यातील काही उपक्रम म्हणजे मुलांना गोष्ट वाचून दाखवताना मध्येच थांबून पुढे काय होईल असा अंदाज करायला सांगणे, गोष्टीतील पात्र बदलून गोष्ट पुन्हा लिहायला सांगणे,गोष्टीवर आधारित चित्र काढायला सांगणे, गोष्टीशी संबंधित एखादा व्यक्तिगत अनुभव लिहायला सांगणे, गोष्टीचे नाट्यीकरण, पपेट शो करणे इत्यादी. यातले २-३ उपक्रम बघूया.

'भटकबहाद्दर बोकोबा' या पुस्तकाची गोष्ट अशी आहे की, एक बोकोबा असतो. तो भटकत एका जहाजावर पोहचतो. तेथील कॅप्टन वाईट असतो. तो बोकोबाला जहाजातून फेकून द्यायचे फर्मान काढतो. पुढे बोकोबा उंदराच्या मदतीने सर्वांचा काटा काढतो. या गोष्टीवर मुलांना 'जहाजातील कॅप्टन दयाळू आहे' असं समजून गोष्ट पुन्हा लिहा असं सांगितलं. 'इटकू पिटकू' वाचून दाखवल्यानंतर तुम्ही जर इटकू पिटकू (उंदीर) असता तर तुम्ही काय काय केलं असतं? असं लिहायला सांगितलं.

मुलांनी विचार करून खूप कायकाय लिहिलं. हीच मुलं सुरुवातीला लिहायला सांगितलं तर ''ताई, आम्हाला लिहिता येत नाही, काय लिहू, कसं लिहू?'' असे प्रश्न विचारून भंडावून सोडायची.

'का का कुमारी' हे महाश्वेता देवी यांचं पुस्तक बंगाल प्रांतातील आदिवासी समाजातील लोकांच्या त्या काळातील समाजव्यवस्थेला प्रश्न विचारणारं पुस्तक आहे. पुस्तकातील पात्र- मोयना नावाची मुलगी- सर्वांना अगदी नेमके प्रश्न विचारत असते. ही गोष्ट वर्गात वाचून दाखवल्यानंतर मुलांना विचारलं, ''तुम्हालाही असे खूप प्रश्न पडतात का?'' मुलांनी होकार दर्शविला. मग त्यांना सांगितलं की तुम्ही तुमच्या गावातील सरपंचाला, शाळेतील मुख्याध्यापकांना, अंगणवाडीच्या ताईला कोणते प्रश्न विचाराल ते लिहून काढा. पाचवी ते सातवीच्या मुलांनी लिहिलेले काही प्रश्न-

१. गाळाचा पाडा व नाकाडपाडा यांच्या मध्यभागी असलेले पूल का होत नाही?
२. ज्यांच्याकडे गवताची झोपडी आहे त्यांना विटांची घरे का बांधून दिली जात नाहीत?
३. अंगणवाडीतील ताई रोज का वेळेवर येत नाही?
४. आमच्या गावात जत्रा का भरत नाही?
५. आमच्या गावात दुसऱ्या जातीचे लोक का राहत नाहीत?
६. आमच्या गावात पत्रपेटी, पोस्टमन का नाही ?
७. गावात वाचनालय का नाही?


८. आमच्या गावात स्मशानखायी (स्मशानभूमी) का नाही?

९. गावात विहीर आहे पण २ कि.मी. वर आहे ती जवळ का खोदून देत नाहीत?

१०. पोलीस पाटील गावातील दारू का बंद करत नाही?

मुलांचे हे प्रश्न आपल्याला एक प्रौढ म्हणून अंतर्मुख करायला लावणारे आहेत. अशा प्रकारचं लिखाण फक्त मुलांच्या भाषिक विकासापर्यंतच मर्यादित राहात नाही तर त्यांना एक जागरूक नागरिक बनविण्यासाठीही साहाय्यक ठरतं. जेव्हा मुलांना त्यांच्या अनुभवातलं, त्यांच्या स्तरावरचं काम दिलं जातं तेव्हा ती त्यात खूप रस घेऊन काम करताना दिसतात. आपल्या परिसरातील घटना लक्षात घेऊन, नवे शब्द, विचार, संदर्भ यांबद्दल गटात चर्चा करून त्याविषयी आपलं मत मांडण्याचा मुलं प्रामाणिक प्रयत्न करतात.

पुस्तक वाचन आणि उपक्रमांना जोड आहे ती बालसिनेमांची. दोन महिन्यांतून एकदा मुलांना सिनेमा दाखवला जातो. कधीकधी सिनेमाचा विषय एखाद्या पुस्तकाच्या विषयाला अगदी चपखल बसतो (उदा. 'उडणारा मासा' या पुस्तकाला 'फाइंडिंग नीमो' या सिनेमाची जोड) आणि मग तो सिनेमा ती गोष्ट वाचून दाखवण्याआधी किंवा वाचून झाल्यानंतर लगेच दाखवला जातो. पहिल्यांदा जेव्हा मुलांना त्यांना सिनेमा दाखवला जाणार आहे असं सांगितलं तेव्हा त्यांनी क्रिश, धूम, टाईमपास अशा सिनेमांची मागणी केली. त्यांना जेव्हा 'आय ॲम कलाम' आणि 'बोक्या सातबंडे' हे सिनेमे दाखवण्यात आले तेव्हा त्यांचा थोडा भ्रमनिरास झाला खरा, पण ते सिनेमेही त्यांना खूप आवडले आणि मग पुढल्या वेळी कोणता सिनेमा दाखवणार असं ती विचारू लागली. सिनेमाचं प्रक्षेपण होत असताना विजेचा पुरवठा खंडित होऊ नये म्हणून गाडीमध्ये सोलर पॅनलची सोय केलेली आहे, ज्यातून सिनेमा प्रक्षेपणासाठी वीज वापरता येते आणि काहीही व्यत्यय येत नाही. सुरुवातीच्या काळात



भटक बहाद्दर बोकोबा

एक गारगांव नावाचे गांव होते. तिथे भटक बहाद्दर राहत होता. एकदा काय झाले या बोकोबाला जहाजा वर फिरून यायला वाटले म्हणून तो जहाजावर गेला. तर तिथल्या एका माणसाने बोकोबाच्या पाठीवर लाथ मारली. बोकोबा पडले तेवढ्यात जहाजातील कॅप्टनने बोकोबाला लाथ मारू नका असे. सांगितले. त्यांवर बोकोबा कॅप्टनाचे पाय चाटायला लागला.. कॅप्टनाने त्यांला उचलून घेतले. त्यांच्या पाठीवरून हात फिरवला. कॅप्टनाने आच्यारी बुवाला सांगितले. बोकोबाच्या मनासारखे जेवण बनवले. बोकोबासाठी खीर मासे मटन केक दही दूध चीज तयार करण्यात ~~आले~~ होते. आले. बोकोबाने सगळे खाले. त्या दिवसा पासून कॅप्टन बोकोबा मित्र झाले.

नाव: लावीता शंकर
शिडा
इयत्ता साहवी

सिनेमा प्रक्षेपणाच्या वेळी मुलांचं लक्ष प्रोजेक्टर, स्क्रीन इत्यादींकडे जास्त असायचं. पण आता तसं होत नाही.

पुस्तकगाडी आता मुलांना सवयीची झाली आहे. गाडी शाळेच्या आवारात दिसली रे दिसली की आमच्या वर्गात या, आमच्या वर्गात या असा एकच सूर मुलं लावतात.

**शालिनी नारनवरे**
shalini.narnaware@quest.org.in
7350443002

## बालवाडीतील वाचनालय

(पान ८ वरून) मग ताईंचे पाहून ते सुलटे केले जाते. कधी कधी ओळखीची गोष्ट योग्य क्रमाने पुढे सरकत नाही हे लक्षात आल्यावर पुस्तक सुलटे केले जाते, तर कधी ताई एखादा प्रश्न विचारून पुस्तक उलटे धरले आहे हे मुलांच्या लक्षात आणून देतात. जसे की,

''हे काय आहे?''

''माणूस आहे.''

''माणूस कशावर उभा राहतो?''

''पायावर.''

''मग हा डोक्यावर का उभा राहिलाय?''

''पुस्तकच उलटं धरलंय मी,'' असे म्हणून मूल पुस्तक सुलटे करते.

तोंडी भाषा व लेखी भाषा यांमध्ये असणारे नाते मुलांना जसजसे समजू लागते तसतसे ती चित्रे काढून स्वलिपीत गोष्टही लिहू लागतात. गोष्ट कधी पुस्तकातील असते तर कधी मनाची तर कधी पात्रे पुस्तकातील व गोष्ट मनाची असे असते. पुस्तकांची ओळख करून देताना लेखक, चित्रकार, प्रकाशन यांचीही ओळख करून दिली जाते. त्यामुळे मुलांनी गोष्ट लिहिल्यावर लेखक व चित्रकार म्हणून मुले स्वतःचे नाव टाकतात. वाचनालयात एक स्टोरी बोर्ड लावलेला असतो. यामध्ये पुस्तकातील पात्रे, गोष्ट कोठे घडली, काय झाले, केव्हा झाले, गोष्टीचा शेवट आणि गोष्ट आवडली किंवा नाही व ती का या मुद्द्यांवर चित्रे व स्वलिपीतील लिखाणाच्या माध्यमातून मुले पुस्तकाचा आढावा घेतात. या सर्व उपक्रमातून मुले विचार करायला शिकतात.

स्वलिपीत केलेले लेखन मुले ताईंना वाचून दाखवतात व ताई दुसऱ्या कागदावर ते देवनागरी लिपीत लिहून काढतात. दोन्ही लेखन शेजारी शेजारी लावून ठेवले जाते व त्याचे पुन्हा पुन्हा वाचन केले जाते. रूढार्थाने लिहिता-वाचता येत नसूनही वर्ग-वाचनालय व लेखन कोपरा यांमुळे मुलांच्यात लिहिण्या-वाचण्याविषयी आत्मविश्वास निर्माण होतो.

**समीरा कुरेशी**
samipnature@gmail.com
9767008200

# खेळघरातील वाचनजत्रेच्या निमित्तानं...

शुभदा जोशी



शिक्षण वंचितांपर्यंत पोचावं, आनंदाचं व्हावं या उद्देशानं पालकनीती परिवार संस्थेनं सुरू केलेला 'खेळघर' हा एक उपक्रम! या उपक्रमाच्या माध्यमातून पुण्यातील कोथरूड येथील लक्ष्मीनगर या झोपडवस्तीतील मुलामुलींबरोबर आणि पालकांबरोबर शिकण्या-शिकवण्याचं काम गेली अठरा वर्षं चालू आहे. मुलांसाठी पुस्तकांच्या दुनियेची दारं उघडावीत, त्यात त्यांनी मुक्तपणे रमून जावं, त्यांच्यासाठी नव्या माहितीची, संधींची दारं उघडावीत यासाठी खेळघरानं सातत्यानं काम केलं आहे. या वर्षीच्या उन्हाळी सुट्टीमध्ये मुलांसमवेत कार्यकर्त्यांनीही वाचनजत्रेच्या माध्यमातून सलग काम केलं. त्या वाचनजत्रेबद्दल...

काही वर्षांपूर्वीपर्यंत, 'खेळघरातली मुलं एका जागी बसून वाचत नाहीत,' अशी आमची सातत्यानं तक्रार असे. वाचनजत्रेसारख्या उपक्रमांमुळे त्यांना काही काळापुरतं वाचावंसं वाटे पण नंतर पुन्हा पहिले पाढे पंचावन्न! याची कारणंही आम्हाला समजत होती. या मुलांच्या घरांत आणि शाळांतही त्यांना मोठी माणसं वाचताना दिसत नाहीत, पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त छापील साहित्य दृष्टीस पडत नाही, त्यांच्या आसमंतात पुस्तकांचा गंध नाही. हे पहिलं महत्त्वाचं कारण! दुसरं कारण म्हणजे आमच्याकडच्या उपलब्ध बालसाहित्यात त्यांच्या भावविश्वाचं प्रतिबिंब नसे. मध्यमवर्गीय मुलांसाठी ते लिहिलं गेलं आहे असा प्रत्यय वारंवार येत असे.

मात्र गेल्या ५-७ वर्षांपासून ही परिस्थिती बदलली आहे. आम्ही इयत्ता पहिलीपासूनच्या मुलांबरोबर भाषेसंदर्भात जाणीवपूर्वक काम सुरू केलं आहे. मुलांच्या भाषिक क्षमतांनुसार गट बनवून त्या त्या गटाबरोबर स्वतंत्रपणे काम केलं. आता औपचारिक भाषा-शिक्षणाच्या उंबरठ्यावरच मुलांना भरपूर पुस्तकं बघायला, वाचायला मिळतात. मुलांना ती सहज दृष्टीस पडतील, हाताळता येतील अशी रचना वर्गांमध्ये केलेली असते. लिपीची ओळख होण्याआधीपासून मुलांची पुस्तकांशी दोस्ती होते. मुलं त्यातली चित्रं पाहतात, चित्रांवरून स्वत:ची गोष्ट रचतात, त्यावर चित्रं काढतात. दुसऱ्या बाजूला लिपीची ओळख झाल्यावर मुलांना चित्रांच्या शेजारचा मजकूरही समजू लागतो. मुलं अंदाजानं वाचता वाचता हळूहळू छान वाचू लागतात. मुलांच्या साक्षर होण्यात साथीला असलेल्या पुस्तकांची ही दोस्ती पुढेही टिकण्याची शक्यता वाढते.

याबरोबरच बालमनाला आकर्षून घेतील अशा बालसाहित्याचा आम्ही आवर्जून शोध घेतला. नॅशनल बुक ट्रस्टची अनेक चांगली पुस्तकं उपलब्ध होती, परंतु नुकतं वाचू लागलेल्या मुलांसाठी भरपूर चित्रं आणि थोडा मजकूर अशी फारशी पुस्तकं आम्हाला मिळाली नाहीत. तुलिका प्रकाशनानं मुलांसाठी फार सुंदर पुस्तकं प्रकाशित केली आहेत. ज्योत्स्ना प्रकाशनानं त्यातली काही मराठीत आणली आहेत. तुलिकानं काढलेल्या मराठी आवृत्त्यांमध्ये मात्र काही चुका राहून गेलेल्या आढळतात. बालभवननं 'कजा कजा मरू' च्या माध्यमातून अनेक उत्तम पुस्तकं मुलांना त्यामानानं स्वस्तात उपलब्ध करून दिली आहेत. 'प्रथम बुक्स' चीही काही पुस्तकं मुलांना आवडतात. माधुरी पुरंदरेंची पुस्तकं हाती लागल्यावर मात्र मौल्यवान खजिनाच मिळाल्याचा आनंद झाला. 'राधाचे घर' आणि 'यश' ही पुस्तकं मुलांमध्ये इतकी प्रिय झाली की आम्ही त्यांच्या २-३ मुलांमध्ये एक अशा अनेक प्रती खरेदी केल्या. ह्या पुस्तकांमध्ये आशयसंपन्न शब्दभाषा आणि संवादी चित्रभाषा अशी दुहेरी मेजवानी! मुलं ही पुस्तकं पुन्हा पुन्हा वाचतात, बघतात; त्यातल्या

चित्रांशी गप्पा मारतात. मुलांना वाचनाच्या आणखी पुढच्या टप्प्यावर न्यायचं आव्हान आमच्यापुढे होतं. शब्दांमधून व्यक्त होणाऱ्या आशयाशी दोस्ती करायची होती. थोड्या गंभीर, माहितीप्रधान साहित्याची ओळख करून घ्यायची होती. 'आपल्याला पडणाऱ्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी ही पुस्तकांची दुनिया उपयोगी पडणार आहे,' अशी अनुभूती त्यांना मिळावी अशी आमची इच्छा होती.

यासाठी वेगळ्या आणि अधिक प्रयत्नांची गरज होती. म्हणून आम्ही सुट्टीत मुलांसाठी वाचनजत्रा घेण्याचं ठरवलं. पुस्तकांच्या दुनियेत मुलांनी रमावं असं वाटत असलं तर आधी त्यांच्या सहवासातल्या मोठ्यांना वाचनाची असोशी वाटायला हवी. खेळघरातल्या ताया पुस्तकं वाचत होत्या पण कामापुरती! काहींना त्यातल्या अद्भुत आनंदाची चव अजून समजली नव्हती. यासाठी आम्ही तायांनी महिनाभर वाचनावर काम करायचं ठरवलं. मुलांसाठी लिहिलेली भरपूर पुस्तकं वाचली. त्यावर बोललो.

माधुरी पुरंदरेंची, प्रकाश नारायण संतांची, जी.ए. कुलकर्णींची मुलांसाठीची पुस्तकं आम्हा मोठ्यांनाही अतिशय आवडत होती. बालमनाचं या पुस्तकांमधलं प्रतिबिंब जाणवून आम्ही हरखून जात होतो. या पुस्तकांमध्येही मध्यमवर्गीय घरांमध्ये घडणारे प्रसंग, व्यक्तिरेखा आहेत. मात्र बालमनाची विचार करण्याची पद्धत, भावविश्व आतिशय संवेदनक्षमतेनं टिपलं आहे. उदाहरणार्थ 'कंटाळा' हे यश मालेतलं पुस्तक! सगळ्या मुलांना कधी ना कधी कंटाळा येतोच. हे पुस्तक लहान मुलाला कंटाळा येणं, आई-बाबांच्या नेहमीच्याच कामांमधे सहभाग घेत घेत काही वेगळं गवसत जाणं आणि कंटाळ्याची आठवणही न राहाणं असा प्रवास करतं. त्यामुळे जरी ते मध्यमवर्गीय घरांत घडणारं असणारं तरी मुलांच्या भावविश्वातली एक जागा अचूक शोधतं आणि त्यामुळे मुलांना आपलंसं करतं.

आम्ही सगळ्यांनी पालकनीतीचा २०१३ चा बाल-साहित्याबद्दलचा दिवाळी अंक वाचला. त्यावर बोललो. संवादकीय आणि इतरही लेखांतून चांगलं बालसाहित्य कोणतं, वाचनाचं माणसाच्या आयुष्यात काय देणं असतं. मुलांचं वाचन समृद्ध व्हावं यासाठी मोठ्यांची भूमिका काय असावी अशा अनेक मुद्द्यांसंदर्भात स्पष्टता आली.

कवितांची पुस्तकं आजवर थोडी बाजूला राहत होती. विंदा करंदीकर, अनंत भावे, नीलिमा गुंडी यांची पुस्तकं आम्ही आवर्जून वाचली. वाचता वाचताच या पुस्तकांच्या अनुषंगानं मुलांसमवेत घेता येतील अशा उपक्रमांच्या नवीन नवीन कल्पना सुचू लागल्या. आता वाचनजत्रेच्या आखणीत रंग भरले जाऊ लागले.

१ जून ते १२ जून सलग १२ दिवस मुलांबरोबर वाचनाशी जोडून विविध उपक्रम घ्यायचे असं ठरवलं. त्याप्रमाणे खेळघरातल्या वेगवेगळ्या वयोगटांतल्या मुलांबरोबर उपक्रमांची आखणी केली. पुस्तकांच्या दुनियेत मुलांनी मनापासून, आनंदानं शिरावं यासाठी मुलांशी संवाद साधणारी भित्तीपत्रकं तयार केली. वेगवेगळ्या विषयांवरच्या पुस्तकांनी कोपरे सजले. काही कविता, मोठ्या आशयाला कवेत घेणारे वेचे भिंतींवर विराजमान झाले.

वाचनजत्रेतला सुरुवातीचा काही वेळ मुक्तपणे मुलांना पुस्तकांच्या दुनियेत रमण्याकरता राखून ठेवला होता. त्या त्या वयोगटानुसार रोज एका नवीन, मुलांना पुढच्या टप्प्यावर नेणाऱ्या आशयसंपन्न पुस्तकाशी जोडून उपक्रमांची आखणी केली होती. उदाहरणार्थ - 'देणारं झाड' ह्या शेल सिल्वरस्टाईन यांच्या पुस्तकावर पाचवी-सहावीच्या मुलांनी नाटक बसवलं. झाडाची प्रतिकृती तयार केली. मुलांना हे पुस्तक वाचून काय वाटलं त्यावर लेखन झालं. समारंभाच्या दिवशी मुलांनी हे नाटक करून दाखवलं. पहिलीच्या मुलांनी 'मल्ली' या जीवा रघुनाथ यांच्या तुलिका प्रकाशनच्या पुस्तकावर नाटक बसवलं. तिसरीच्या मुलांनी 'तूच का गं माझी आई' या पी.डी. ईस्टमन यांच्या पुस्तकावर नाटक बसवलं. छोट्यांनी समारोपाच्या कार्यक्रमात सादर केलेली ही नाटकं पाहून आम्हा मोठ्यांना खूप छान वाटलं. सरावाचा ताण न घेता उत्स्फूर्तपणे नाटकं सादर झाल्यामुळे नाटकाच्या आत नाटकं घडत होती आणि धमाल येत होती. अनंत भावेंचं 'लालम लाल,' विंदा करंदीकरांचं 'पिशी मावशीची भुतावळ' अशा कवितांच्या पुस्तकांनीही धमाल आणली. या कवितांवरून प्रेरणा घेऊन मुलांनीही कविता बनवल्या. मुलांच्या मनोगतांच्या कवितांच्या त्यांनीच केलेल्या वाचनानं, समारोपाच्या कार्यक्रमाला आलेल्या पाहुण्यांना वाचनजत्रेची झलक अनुभवायला मिळाली.

वाचनजत्रेच्या शेवटच्या दिवशी दिनांक १३ जूनला वाचनजत्रेचा समारोपाचा कार्यक्रम सादर झाला. खेळघरात पाहुण्यांसाठी पुस्तकांचं, त्यानिमित्तानं तयार झालेल्या शैक्षणिक साहित्याचं प्रदर्शन भरवलं होतं. त्या पुस्तकांमधली मुलांनी वाचलेली, त्यांची दोस्त पुस्तकं पाहून मुलं खुश होत होती. ही दुनिया आता मुलांसाठी अनोळखी राहिली नव्हती. मुलं आता पुस्तकांच्या दुनियेचे प्रवासी बनली होती. खेळघरातील सर्व स्वयंसेवी कार्यकर्ते, मित्र, सुहृद, देणगीदार यांना १३ जूनच्या कार्यक्रमाचं आमंत्रण होतं. त्यांच्या उपस्थितीनं, त्यांनी केलेल्या कौतुकानं मुलांचा आणि आम्हा तायांचाही हुरूप वाढला.

या जत्रेतून पुस्तकांबद्दलचं प्रेम मुलांच्या-तायांच्या मनात रुजायला अवकाश मिळाला. हा उत्साह टिकावा, लाटेसारखा विरून जाऊ नये यासाठी सातत्यानं प्रयत्न करायला हवेत. आम्हा तायांच्या वाचनाला गती मिळावी म्हणूनही आवर्जून प्रयत्न करायला हवेत याचं भान आमच्या कामाला ऊर्जा देत राहील, असं वाटतं!

**शुभदा जोशी**
shubha_kh@yahoo.co.in
9822094095

Published & Posted on 16 July 2015
Posted at Marketyard PSO, Pune 411037.
on 16th of each month

RNI No. MAH MAR 2001/4166
Registered No. PCW/ 026/ 2015-2017

शहाणी वेबपणे

# बहुरूपी गूगल
## भाग १

इंटरनेटवर काम करताना 'गूगल' वापरत नाही अशी व्यक्ती क्वचितच आढळेल. अगदी इंटरनेटची बाराखडी इथपासूनच सुरू होते असे म्हणता येईल. व्यक्ती, स्थळे, त्यांचे संदर्भ, विविध छायाचित्रे, नकाशे आणि अन्य माहितीसाठी आपल्यापैकी प्रत्येकजण हा गूगलची मदत घेत असतो. इंटरनेटच्या महाजालावर आज गूगलचे वर्चस्व स्थापित झाले आहे. सर्च करणे किंवा शोध घेणे हे गूगलचे सर्वात प्रमुख काम आहे. तीच त्याची सर्वात मोठी खासियत आणि ताकदही समजली जाते. संगणकावर स्वभाषेत टाईप करणे आणि ते इतरांपर्यंत पोहचवणे हे काही दशकांपूर्वी स्वप्नवत वाटायचे मात्र आज ते शक्य झाले आहे ते गूगलमुळेच. आज भारतीय भाषांबरोबरच जगातील बहुसंख्य भाषांमधून गूगल त्याच्या सेवा पुरवीत आहे.

गूगल कंपनी प्रामुख्याने आंतरजाल शोध व आंतरजाल जाहिराती या क्षेत्रांमध्ये सेवा पुरविण्याकरीता १९९८ मध्ये सुरू झाली. गूगल हे नाव Googol या मूळ इंग्रजी नावावरून आले आहे. एकावर शंभर शून्य ह्या मोठ्या संख्येचे Googol हे नाव आहे. (ही माहितीही मला अर्थातच गूगलवरच मिळाली.)

अगदी साधी रचना पण प्रभावशाली तंत्रज्ञान हेच गूगलच्या व्याप्तीमागचे कारण समजले जाते. गूगल या सर्च इंजिनशिवाय जी-मेल ही ई-मेलसेवा ते यूटयूबसारखी व्हीडिओ शेअरिंग सेवा तसेच गूगल प्लससारखी सोशल नेटवर्किंग सेवा अशा तमाम उपयुक्त गोष्टींवर गूगलची पकड आहे. आज बहुचर्चित आणि जवळ जवळ प्रत्येकाच्याच खिशात असलेल्या स्मार्टफोनवरील 'अँड्रॉइड' हे मोबाइल ऑपरेटिंग सॉफ्टवेअरही गूगलचेच आहे. या अशा बहुरूपी गूगलच्या काही रूपांना थोडे जाणून घेऊयात.

जीमेल ही सर्वांना परिचित असणारी गूगलची इमेल सेवा. यात माहितीची देवाणघेवाण तात्काळ करता येते. आज उपलब्ध असलेल्या सर्व इमेल सेवांमध्ये सर्वात सोपी, जलद आणि भरपूर स्पेस उपलब्ध करून देणारी अशी या सेवेची ख्याती आहे.

क्लाऊड स्टोअरेज हा शब्द कधी एकलाय का? क्लाऊड स्टोअरेज या शब्दाचा अर्थ असा की तुमच्या वेगवेगळ्या प्रकारच्या फाईल्स एका विशिष्ट ठिकाणी साठवून ठेवणे. कुणाला वाटेल की त्यात काय विशेष? आपण आपल्या संगणकावर या फाईल्स साठवतोच की. अगदी बरोबर आहे मात्र समजा तुम्ही परगावी आहात. तुमच्या संगणकापासून लांब. अशा वेळी त्यातल्याच एखाद्या फाईलची तुम्हाला गरज भासली तर? अशा वेळी गूगल ड्राइव्ह हे क्लाऊड स्टोअरेज तुमच्या मदतीला येऊ शकते. तुमचे जर जीमेल खाते असेल तर १५ जीबी इतकी जागा मोफत देणारे हे गूगल ड्राइव्ह क्लाऊड स्टोअरेज तुमच्या मदतीला हजर असते. ज्यात तुम्ही तुमच्या साठवलेल्या फाईल नुसत्या पाहूच शकत नाहीत तर त्यात हवा तो बदल देखील करू शकता. या फाइल्स तुम्ही तुमच्या मित्रांसोबत शेअरही करू शकता. तसेच एकच फाइल अनेकजण एकाच वेळी संपादितही करू शकतात. एकाच वेळी अनेकांना एकाच डॉक्युमेंटवर काम करता येऊ शकणे हा गूगलचा एक उच्च अभियांत्रिकी शोध मानला जातोय.

आपले विचार, कल्पना आणि सर्जनशीलता सादर करण्यासाठी आजच्या जमान्यातील अत्यंत उपयुक्त असे व्यासपीठ म्हणजे ब्लॉग. एखाद्या वेबसाईटप्रमाणे काम करणारा हा ब्लॉग आजच्या जगातील विचार-प्रकटनाचं एक प्रभावी माध्यम बनला आहे. सध्या गूगलची Blogger ही सेवा सर्वश्रुत आहे. ब्लॉगवर नुसते लेखच लिहिता येतात असे नव्हे तर आपण काढलेली छायाचित्रे, व्हिडिओ आणि संगीतदेखील प्रसिद्ध करता येते. आपले विचार, कल्पना, साहित्य जगासमोर मांडणारे आपणही एखादे ब्लॉगवाले बनू शकतो.

चलचित्रातून माहिती प्रत्येकालाच साक्षात अनुभव देणारी गोष्ट असते. हेच गूगलने जाणून गूगलची YouTube ही सेवा सुरू केली. यूट्यूब म्हणजे शैक्षणिक, मनोरंजन, पर्यटन, आणि अशा अनेक विषयांवरील अमर्याद व्हिडिओ असणारे एकमेव ठिकाण. अलीकडे शालेय विद्यार्थी आणि शिक्षक यांच्याकडून या सेवेचा वापर खूप मोठ्या प्रमाणात वाढत आहे. येथे आपले स्वतःचे व्हिडिओ अपलोड करून प्रसिद्ध करता येतात आणि इतरांचे डाउनलोडदेखील करता येतात.

नावीन्यपूर्ण आणि कलात्मकतेने एखादा विषय मांडण्यासाठी प्रसिद्ध असणाऱ्या गूगलच्या होमपेजवर विशेषदिनी एखादे चित्र किंवा ॲनिमेशन अशा स्वरूपात सुंदर कलाकृती साकारली जाते. त्याला डूडल असे म्हटले जाते. आज एखाद्या विशेषदिनी गूगल संकेतस्थळाचे डूडल काय असेल याविषयी सर्वांनाच उत्सुकता वाटू लागली आहे. काही वर्षांपूर्वीचे एक डूडल मला आठवते. त्या दिवशी गूगल चक्क झिप चेनने उघडावे लागत होते. कारण झिप चेनचा शोध लावणाऱ्या जीडिऑन संडबेक यांची जयंती होती. झिप चेनच्या जनकाला गूगल डूडलने दिलेली ही आगळी वेगळी आदरांजली होती. या प्रत्येक डूडलवरती क्लिक केले असता आपल्याला त्याविषयी अधिक माहिती गूगल पुरवते. कितीतरी माहीत नसलेल्या गोष्टी या डूडल्समुळे समोर येतात. कधीकधी डूडल्सच्या डिझाईन करून पाठवण्याचे आवाहन गूगल करते त्यात आपणही सहभाग घेऊ शकतो.

गूगलच्या इतर काही सेवा आणि त्याचा वापर याबद्दल पुढील अंकात आणखी जाणून घेऊ.



**प्रकाश अनभूले**
anbhuleprakash@gmail.com
9960460474